www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ कोकण भवनात भारतीय प्रजासत्ताक दिन पूर्व तयारीची...
पान ३ वर....

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ संतोष देशमुख हत्येप्रकरणी राज्यपालांनी...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २१२ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, ०७ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### स्वतःच्या अपयशासाठी शेजाऱ्यांना दोष देणे ही पाकची प्रथा - रणधीर जयस्वाल

**नवी दिल्ली :** महिला आणि मुलांसह अफगाण नागरिकांवर पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र चिंता व्यक्त करून भारताने ( India) हल्ल्यांचा तीव्र निषेध केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पाकिस्तानच्या अंतर्गत अपयशांसाठी शेजाऱ्यांवर दोष ढकलण्याच्या दीर्घकाळ चाललेल्या प्रथेवर टीका केली. ते म्हणाले, भारताने महिला आणि मुलांसह अफगाण नागरिकांवर झालेल्या हवाई हल्ल्यांवरील वृत्तांची नोंद घेतली आहे. या हल्ल्यामध्ये अनेकांनी जीव गमावले आहेत.जयस्वाल पुढे म्हणाले, भारत निष्पाप नागरिकांवरील कोणत्याही हल्ल्याचा निःसंदिग्धपणे निषेध करतो. स्वतःच्या अंतर्गत अपयशासाठी शेजाऱ्यांना दोष देणे ही पाकिस्तानची जुनी प्रथा आहे. भारताने या संदर्भात अफगाण प्रवक्त्याची प्रतिक्रिया देखील लक्षात घेतली असल्याचेही जयस्वाल यांनी यावेळी नमूद केले आहे.

### भाजपाचे राज्यव्यापी विशेष सदस्य नोंदणी अभियान सुरू - रविंद्र चव्हाण

**मुंबई** - भारतीय जनता पार्टीच्या सदस्य नोंदणी अभियानाला अधिक गति देण्याच्या उद्देशाने रविवार ५ जानेवारी रोजी राज्यभर विशेष सदस्यता नोंदणी अभियान राबवण्यात येत आहे. यानिमित्त एकाच दिवशी २५ लाखांहून अधिक सदस्य नोंदणी करण्याचे लक्ष्य आहे अशी माहिती संघटन पर्व प्रभारी आ. रविंद्र चव्हाण यांनी दिली. यावेळी प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते. पक्षाचे राज्यातील सर्व मंत्री, आमदार, खासदार, नेते पदाधिकारी या अभियानात सहभागी होणार आहेत. श्री.चव्हाण म्हणाले की, या विशेष सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे नागपूर येथून सुरू केली. भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता, लोकप्रतिनिधी, नेते, आमदार ही सर्व मंडळी रस्त्यावर उतरून प्रत्येक बूथ पर्यंत पोहोचून जास्तीतजास्त नागरिक भाजपाशी जोडला जाईल यासाठी प्रयत्न करणार आहेत.



## धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडमुळेच पंकजा मुंडेंचा पराभव - सुरेश धस

● बीड, दिगंबर जाधव :

धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्या वागण्यामुळेच पंकजा मुंडे यांचा लोकसभेत पराभव झाला, मात्र त्यासाठी आम्हाला जबाबदार ठरवण्यात आलं असा आरोप भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला. वाल्मिक कराडमुळेच बजरंग सोनवणे हे धनंजय मुंडे यांना सोडून गेले. समोर तगडा उमेदवार उभा राहिल्यानेच पंकजा पराभूत झाल्या असंही सुरेश धस म्हणाले. टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीला मुलाखत देताना सुरेश धस यांनी हे वक्तव्य केलं. वाल्मिक कराडने धनंजय मुंडेंना एकही मित्र ठेवला नाही असा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला. ते म्हणाले की, "वाल्मिक कराड आणि विष्णू चाटेमुळे बजरंग सोनावणे हे धनंजय मुंडेंपासून बाजूला गेले.
पान २ वर

## मुंबई महानगर क्षेत्रात 'केबल कार' प्रकल्पाचा मानस - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



● ठाणे, रोहित जैसवाल :

रस्ते वाहतूक, रेल्वे तसेच मेट्रो यासारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांवरील वाढता ताण लक्षात घेता भविष्यात 'केबल कार' सेवा विकसित होणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे सर्वेक्षण करून विकास आराखडा (DPR) तयार करणे गरजेचे आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या भेटी दरम्यान या प्रकल्पाच्या सादरीकरणाद्वारे मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या दृष्टीने या प्रकल्पाची आवश्यकता मांडण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी

नवी दिल्ली येथे ७ जानेवारी रोजी होणाऱ्या 'विकसित भारत २०४७' या महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या लक्ष्य प्राप्तीच्या दृष्टीने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या सर्व राज्यांच्या परिवहन मंत्र्यांच्या बैठकीस परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन सादरीकरणानंतर मुंबई महानगर क्षेत्रामध्ये 'केबल कार' प्रकल्प राबवण्यासाठी केंद्र सरकारद्वारे 'पर्वतमाला परियोजना' अंतर्गत सार्वजनिक खासगी भागीदारी (PPP) अथवा केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त आर्थिक भागिदारीने रोप वे विकसित करण्याचा मानस असून यासंदर्भातील विकास आराखडा तयार करुन तत्वत: मान्यता घेण्याचा प्रयत्न राहील, असेही मंत्री श्री. सरनाईक यांनी सांगितले.
पान २ वर

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात साधला विधी शाखेच्या विद्यार्थी व भावी वकिलांशी संवाद...

■ पुण्यातील श्री शिवाजी मराठा सोसायटी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मंत्रालयात संवाद
■ संविधान व कायद्यांबाबत जागरुकतेसाठी विधी शाखेच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा - उपमुख्यमंत्री अजित पवार



● मुंबई, विशाल कारंडे :

लोकशाहीचे बळकटीकरण, सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी भारतीय संविधान आणि देशाच्या नियम-कायद्यांबाबत नागरिकांमध्ये जागरुकता असणे आवश्यक आहे. ही जागरुकता निर्माण करण्यासह समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित पिडीत बांधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, न्यायप्रिय वकिल म्हणून भविष्यात महत्वाची भूमिका बजावावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसोबत मंत्रालयात आयोजित संवादभेटी दरम्यान केले. पुणे येथील श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या विधी महाविद्यालयाच्या पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी, प्राचार्या सिद्धकला भावसार, सहयोगी प्राध्यापक भानुदास गर्जे आदींसह आज मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मंत्रालयात भेट घेतली. मंत्रालयातील उपमुख्यमंत्र्यांच्या समिती सभागृहात झालेल्या संवादावेळी राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, विधी आदी अनेक मुद्यांवर विद्यार्थ्यांनी उपमुख्यमंत्र्यांशी संवाद साधला.
पान २ वर

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धमकी देणाऱ्या तरुणाला अटक



● ठाणे, सम्यक कासारे :

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एका तरुणाने समाजमाध्यांद्वारे शिवीगाळ करत मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. धमकी देणारा तरुण शिंदे यांच्याच कोपरी-पाचपाखाडी मतदार संघातील असल्याचे समोर आले असून या तरुणाला ठाणे पोलिसांनी अटक केली आहे. धमकी देण्याचे मागचे कारण अद्याप समजू शकलेले नसून पोलिस त्याचा तपास करित आहेत. शिवसेनेतील फुटीनंतर राज्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विरुद्ध माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असा सामना रंगला आहे. दोन्ही गटाच्या समर्थकांकडून एकमेकांवरोधात समाजमाध्यमांवर टिकाटिप्पणी केली जात आहे. असे प्रकार सुरू असतानाच, रविवारी एका तरुणाने समाजमाध्यमांवर एक चित्रफित प्रसारित केली. यामध्ये त्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शिवीगाळ करत जिवे ठार मारण्याची धमकी दिली. हि चित्रफित प्रसारित होताच, ठाण्यात शिवसैनिकांकडून संपात व्यक्त होऊ लागला. वागळे इस्टेट भागातील शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी परेश चाळके यांच्या शिवसैनिकांनी रविवारी रात्री श्रीनगर पोलिस ठाणे गाठले आणि शिंदे यांना धमकी देणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.
पान २ वर

## आंब्याच्या पहिल्या पेटीचा मान हापूसऐवजी 'केसर'ला



● नवी मुंबई, भावना जैन :

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ६ जानेवारीला देवगडमधून आंब्याची पहिली पेटी दाखल होत आहे. हापूसपासून या हंगामाचा मुहूर्त होत असतो. मात्र यावर्षी हा मान 'केसर' आंब्याला मिळणार आहे. तसेच नियमित आवक मार्चमध्येच होण्याची शक्यता आहे. आंबा हंगामामध्ये मुहूर्ताला विशेष महत्त्व आहे. बाजार समितीमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या पहिल्या पेटीची विधिवत पूजा करून त्याची विक्री केली जाते.

### दीड महिना उशीर

यावर्षी दीड महिना उशीर झाला आहे. सोमवारी देवगडमधील वाघोटन गावातील शकील मुल्ला या शेतकऱ्याच्या बागेतून आंब्याची पहिली पेटी मुंबई बाजार समितीमध्ये दाखल होणार आहे. पाच डझन आंबा विक्रीसाठी येणार असून, त्याला किती भाव मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. हापूसऐवजी केसर आंबा मुहूर्ताला बाजार समितीमध्ये येत आहे.

आंब्याची पेटी दाखल होत असली तरी हंगाम उशिरा सुरू होणार आहे. फेब्रुवारीपासून आंब्याची थोडी आवक सुरू होईल. १० मार्चपासून आवक वाढेल. १५ ते २० मार्चपासून मुबलक प्रमाणात आंबा उपलब्ध होईल.

**संजय पानसरे, संचालक, फळ मार्केट**

## कुणाचा तरी राजीनामा घेऊन मला मंत्रिपद नको - छगन भुजबळ

● मुंबई, राकेश गायकवाड :




मला मंत्री व्हायचंय म्हणून कुणाचा तरी बळी घ्यावा किंवा कुणाचा तरी राजीनामा घ्यावा आणि मला मंत्री करावं असं माझ्या मनात, स्वप्नातही येणे शक्य नाही. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्या अशी मागणी वारंवार केली जातेय पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्पष्ट बोललेत. बीड प्रकरणाची संपूर्ण चौकशी करणार आणि त्यात जे कुणी दोषी सापडतील, मग कुणीही असतील त्या सर्वांवर कारवाई केली जाईल. पण या अगोदरच धनंजय मुंडेंचा राजीनामा का मागितला जातोय असा सवाल माजी मंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे.

मुंबईतील पत्रकार परिषदेत छगन भुजबळ म्हणाले की, बीडच्या चौकशीत काही बाहेर आलंय का? कुणाकडे काही माहिती असेल तर त्यांनी पोलिसांना द्यावी ते चौकशी करतील. मात्र जोपर्यंत या प्रकरणात त्यांचा हात आहे हे स्पष्ट होत नाही तोपर्यंत त्यांनी राजीनामा का द्यावा आणि मागावा. मला हे योग्य वाटत नाहीत. अशा एका प्रकरणातून मीही गेलोय. २००३ मध्ये तेलगी प्रकरणात त्याला मी पकडले, मोक्का लावला आणि सगळं काही मी केल्यानंतर माझ्यावर आरोप लावण्यात आला. तेव्हा मी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्रीही होतो माझा राजीनामा घेण्यात आला. काँग्रेस राष्ट्रवादीचं सरकार असतानाच मीच सुप्रीम कोर्टात गेलो आणि ती केस सीबीआय दिली. त्यावेळी भाजपा सरकार होते. सीबीआयने त्या खटल्याची पूर्ण चौकशी केली त्यानंतर मी केलेली कारवाई योग्य आहे. तुमचा काहीही दोष नाही असं रिपोर्टमध्ये आले. माझे नावही चार्जशीटमध्ये आले नाही. तरीही उपमुख्यमंत्रिपद, गृहमंत्रिपद गेले, कारण नसताना मनस्ताप झाला. मी हे सगळे भोगले आहे. पुरावा नसताना राजीनामा घेतला गेला. चौकशीत काही सापडले तर तो भाग वेगळा असतो असं त्यांनी सांगितले.
पान २ वर

## H M P V संदर्भात राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यात अलर्ट जारी होण्याची शक्यता!





● मुंबई, विशाल कारंडे :

HMPV हा चीनमध्ये पसरलेला ह्यूमन मेटा प्युमो व्हायरस संसर्ग भारतात पोचला असून बंगलोर मध्ये एका आठ महिन्याच्या मुलीला याची लागण झाली आहे याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात देखील याची लागण होण्यापूर्वी राज्य मंत्रिमंडळाच्या उद्याच्या साप्ताहिक बैठकीत राज्यात आरोग्य विभागाला दर प्राण्याच्या सूचना देण्याबरोबरच पुन्हा एकदा मास्क वापरण्याच्या सूचनांबरोबर गर्दी कमी करण्यासाठी काही उपाययोजना आखण्याची शक्यता राज्य मंत्रिमंडळाच्या उद्या साप्ताहिक बैठकीत होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे

चीनमध्ये ह्यूमन मेटो प्युमो व्हायरस H M PV या रोगाचा उद्रेक झाला असून या विषाणूमुळे मोठ्या प्रमाणात लोकांचे जीव गेल्याचे वृत्त आहे भारतात ही आरोग्य मंत्रालयाने याबाबत क** उपाययोजना चालू केली आहे अनेक राज्यांनी अलर्ट आणि अलर्ट जारी केले आहेत यासह भारतात देखील एच एम पी व्ही विषाणू चे पहिले प्रकरण कर्नाटक मध्ये समोर आले आहे.
पान २ वर

### H M P V म्हणजे काय?

मानवी मेटापिनू मो व्हायरस ज्याला एच एम पी व्ही देखील म्हणतात हा एक विषाणू आहे जो मानवी श्वसन प्रणालीवर परिणाम करतो हे २०२१ मध्ये पहिल्यांदा ओळखले गेले त्यानंतर नेदरलँडच्या शास्त्रज्ञांनी याचा शोध लावला हा P a r a m y x o v i r i d a e कुटुंबातील विषाणू आहे इतर श्वसन विषाणू प्रमाणे ते खोकताना आणि शिंकताना संक्रमित लोकांच्या जवळ राहून देखील पसरतात गेल्या सहा दशकापासून हा विषाणू जगात अस्तित्वात असल्याचा दावा काही अभ्यासाकांमध्ये करण्यात आला आहे

## मुंबईत टॉरेस कंपनीबाहेर गुंतवणूकदारांची गर्दी

### हप्ते थकवले, मालक गायब? पोलीस बंदोबस्त !

● मुंबई, विशाल पाटील :




मुंबईत दादर येथील टोरेस कंपनीबाहेर गुंतवणूकदारांनी गर्दी केली आहे. कंपनीनं दिलेल्या आश्वासनानुसार हप्ते मिळत नसल्याची तक्रार गुंतवणूकदारांनी केली आहे. कंपनीच्या योजनेत अनेकांनी लाखो रुपये गुंतवल्याची माहिती समोर आली आहे. सुरुवातीला कंनपीकडून काही हप्ते देण्यात आले पण गेल्या दोन आठवड्यांपासून कंपनीकडून काहीच माहिती दिली जात नसल्याचं गुंतवणूकदारांचं म्हणणं आहे. कंपनीच्या कार्यालयाबाहेर गर्दी झाल्याची माहिती मिळताच मुंबई पोलीस देखील दाखल झाले आहेत. सध्या कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोलिसांचा बंदोबस्त असून कोणतीच माहिती आम्हाला दिली जात नसल्याचं गुंतवणूकदारांचं म्हणणं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार भरलेल्या रकमेच्या दहा टक्के पैसे दर आठवड्याला मिळणार असल्याचं गुंतवणूकदारांना देण्यात आलं होतं. गेल्या वर्षभरापासून ही कंपनी मुंबईत विविध ठिकाणी कार्यरत आहे आणि डिसेंबर महिन्यापर्यंत लोकांना हप्ते मिळत होते. पण गेल्या दोन आठवड्यांपासून हप्ते मिळत नसल्याचं गुंतवणूकदारांचं म्हणणं आहे.

## संपादकीय

# रशियाची कर्करोगविरोधी लस

सुमारे अडीच पावणेतीन वर्षांपासून युक्रेनच्या युद्धात अडकलेल्या रशियात कॅन्सर प्रतिबंधक लस तयार झाल्याची बातमी ही आश्चर्यकारक घटना म्हणावी लागेल. यासंदर्भातील घोषणा स्वतः रशियाने केली आहे.रशियन आरोग्य मंत्रालयाच्या रेडिओलॉजी मेडिकल रिसर्च सेंटरने यासंदर्भात अधिकृत माहिती जारी केली. अर्थात, कॅन्सर प्रतिबंधक लस कितपत प्रभावी ठरेल, याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. जगभरातील अन्य देशांत या लशीची चाचणी होईल, तेव्हा त्याची कसोटी होईल. पण तूर्त ही लस म्हणजे केवळ २०२४ मधीलच नव्हे तर गेल्या दशकभरातील वैद्यकीय संशोधन क्षेत्रातील सर्वांत मोठे यश म्हणावे लागेल.२०२५ मध्ये रशियातील सर्व नागरिकांना ही लस मोफत उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. आतापर्यंत भारतासह संपूर्ण जगात कॅन्सर या आजारावर सर्वकष उपचार नसल्याचे मानले जात होते. कालांतराने बर्याच औषधोपचारानंतर काही प्रमाणात त्यापासून मुक्ती मिळू लागली. पण आता रशियाने थेट लस विकसित केल्यामुळे या दुर्धर आजाराचा प्रतिबंध करणे शक्य होणार आहे. अर्थात, रशियाच्या लसीच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित राहू शकतो. कारण अलीकडील काळात अशा प्रकारच्या दाव्यांचे पीक आले आहे. अशा स्थितीत रशियाची लस खरोखरच विश्वासपात्र आहे का? असा प्रश्न लोक विचारू शकतात. असे असले तरी रशियन लस किफायतशीर दरात उपलब्ध झाली तर नागरिक डोळे झाकून लसीकरण करून घेतील, यात शंका नाही. यासंदर्भात मागचे एक उदाहरण देणे संयुक्तिक ठरेल. करोनाचा वेगाने प्रसार झाल्याने त्याला रोखण्यासाठी रशियाने स्पुटनिक व्ही लस तयार केली. ही लस सर्वप्रथम अध्यक्ष ब्लादिमीर पुतीन यांनी घेतल्यामुळे रशियाच्या लशीवरचा विश्वास वाढला. कदाचित याहीवेळी पुतीन तोच प्रयोग करतील आणि त्यामुळे जगातील नागरिक या लशीवर विश्वास ठेवतील आणि या आधारे असाध्य समजल्या जाणार्या कर्करोगावर परिणामकारक उपचार सापडला, असे म्हटले जाईल. विशेष म्हणजे 'द सायंटिस्ट' या संकेतस्थळाच्या मते, पंधरा वर्षांपूर्वी न्यूयॉर्क येथे बायोटेक कंपनीने एप्रिल २००८ मध्ये रशियात पहिली कर्करोगावरील लस विकसित होणार असल्याचे जाहीर केले होते आणि त्यास मंजुरी मिळाल्याचे नमूद केले. एखाद्याच्या देशाच्या कर्करोग रोखणार्या लशीच्या निर्मितीला एका नियामक संस्थेने परवानगी देण्याची ही पहिलीच वेळ होती.

अर्थात त्यानंतर दहा वर्षांत या लशीचा विकास कुठपर्यंत झाला, हे समजू शकले नव्हते. मात्र फेब्रुवारी २०२४ मध्ये 'मॉस्को फोरम ऑन फ्यूचर ऑन फ्यूचर टेक्नॉलॉजी प्रोग्रॅम'मध्ये रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी कर्करोग प्रतिबंधक लस लवकरच आणली जाईल, अशी घोषणा केली. मात्र ही लस रशियाबाहेरील जनतेला कधी मिळणार आणि ही लस कोणत्या प्रकारातील कर्करोग रोखण्यास सक्षम असेल याबाबत अद्याप तरी काहीही स्पष्ट झालेले नाहीये.विविध माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या वृत्तांनुसार, ही लस एमआरएनए प्रकारातील आहे. प्रत्यक्षात अशा प्रकारात पारंपरिक लस तयार करताना आजाराला रोखण्यासाठी आजार निर्माण करणार्या संसर्गाचा किंवा त्याच प्रकारातील विषाणूचा वापर केला जातो. फरक एवढाच की कर्करोगाच्या पेशीच्या पृष्ठभागावरील निरुपद्रवी प्रथिने (हार्मलेस प्रोटिन) वेगळे केले जातात आणि त्याला अँटीजेन म्हणून ओळखले जाते. हे अँटीजेन लस निर्मिती प्रक्रियेत आरोग्य चाचणीच्या (क्लिनिकल ट्रायल) काळात मानवी शरीरात सोडले जातात. या आधारे परिणामकारक अँटीबॉडी विकसित करण्याच्या हेतूने रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय केली जाते. 'एमआरएनए' लशीत संक्रमक भूमिकेत असलेले आरएनएच्या एक लहान तुकड्याचा वापर केला जातो आणि त्याच्या मदतीने शरीरातील पेशींना कर्करोगाच्या पेशीशी संबंधित एक विशिष्ट प्रोटीनची निर्मिती करण्याचा संदेश दिला जातो. त्यामुळे रशियन लशीकडे जग उत्सुकतेने पहात आहे.कर्करोगापासून बचाव आणि प्रतिबंध करण्याच्या दिशेने लस तयार करणारा रशिया एकमेव देश नाही. ब्रिटन आणि जर्मनीसह अनेक देशांतील बायोटेक कंपन्यांनी कर्करोगाविरुद्ध परिणामकारक औषधी आणि लस विकसित करण्यात युद्धपातळीवर प्रयत्न केले आहेत. ब्रिटिश सरकार जर्मनीची प्रसिद्ध औषध कंपनी बायोटेकसह एकत्रपणे काम करत कर्करोगाच्या उपचारासाठी लसीची क्लिनिकल ट्रायल करत आहेत. त्यामुळे २०३० पर्यंत दहा हजार कर्करोगग्रस्तांना त्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा आहे.

दुसरीकडे अमेरिकेची मॉडर्ना, मर्क फार्मा कंपनी त्वचेच्या कर्करोगाच्या (स्किन कॅन्सर) एका प्रायोगिक लशीवर काम करत आहेत. या लसीचे प्रारंभीचे निष्कर्ष सकारात्मक सांगितले जात आहेत. या अभ्यासाशी संबंधित दाव्यानुसार या लशीने तीन वर्षांच्या उपचारानंतर त्वचा कर्करोगाचे एक घातक रूप मेलेनोमामुळे होणार्या मृत्यूची शक्यता ही निम्म्याने कमी केली. या शिवाय अन्य सहा लशींवर देखील काम सुरू आहे. या लसी ह्यूमन पेपिलोमा व्हायरसला (एचपीव्ही) रोखू शकतात. ही लस सर्व्हायकल (गर्भाशय) कर्करोगासह काही अन्य प्रकारच्या कर्करोगापासून नागरिकांचा बचाव करू शकते..

आणखी एक उदाहरण कर्करोगावरील एओएच१९९६ नावाच्या औषधाचे मानवावर घेतलेल्या चाचणीचे आहे. त्याची चाचणी सप्टेंबर २०२३ पासून अमेरिकेत केली जात आहे. या औषधाचे नाव १९९६ मध्ये जन्मलेली मुलगी आना ओलिविया होलीच्या नावाने प्रेरित आहे. तिला न्यूरोब्लास्टोमा नावाचा सामान्यपणे मुलांना होणारा कर्करोगाचा आजार झाला आणि त्यात तिचा २००५ मध्ये मृत्यू झाला. पोट, छाती आणि घशातील हाडांत होणार्या या कॅन्सरपासून बचाव करण्यासाठी आणि त्याला रोखण्यासाठी उपयुक्त ठरणार्या या औषधाचे नाव तिच्या स्मरणार्थ ठेवण्यात आले. शास्त्रज्ञांच्या मते, हे औषध आरोग्यदायी पेशींची हानी न करता कर्करोगाच्या ट्यूमरला मुळासकट बाहेर काढण्याचे काम करू शकते. रशियाने कर्करोगाविरुद्धची लस आणल्याने भारताला मोठा दिलासा मिळणार आहे. कारण आपला देश कर्करोगाची राजधानी होण्याकडे वाटचाल करत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, भारतात प्रत्येक दहापैकी एका नागरिकास संपूर्ण आयुष्यभरात कर्करोग होण्याची शक्यता असते आणि ही गंभीर चिंतेची बाब आहे. भारतीय आरोग्य संशोधन परिषद - राष्ट्रीय कर्करोग रजिस्ट्री कार्यक्रमाच्या आकलनानुसार, २०२२ मध्ये भारतात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या १४ लाखांपेक्षा अधिक असून ती आता २०२५ मध्ये वाढत १६.७ लाख होण्याची शक्यता आहे.

# ग्रामीण भागात बिबट्यांची दहशत

पूर्वी क्वचितच नजरेस पडणारे बिबटे आता सर्रास नागरी वस्तीत दिसू लागले आहेत. दररोज कुठे ना कुठे बिबट्याने घुसखोरी केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. पूर्वी फक्त ग्रामीण भागात दिसणारे बिबटे आता पुण्या - मुंबई सारख्या मेट्रो शहरातही दिसत आहेत. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरातील सोसायटी आणि कॉलनीतही बिबटे येत आहेत. बिबट्यांच्या या वाढत्या घुसखोरीमुळे नागरी वस्तीत भीतीचे सावट निर्माण झाले आहे. ग्रामीण भागात तर सर्रास बिबटे नजरेस पडत आहेत. सध्या ग्रामीण भागात ऊस तोडणी सुरू आहे. उसाच्या शेतात बिबट्यांची पिल्ले सापडत आहेत. ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर नित्याचा बनला आहे. नागरी वस्तीत आणि शेतांमध्ये बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांना पकडण्यासाठी वन विभागाकडून पिंजरे लावण्यात येतात. बिबटे नागरी वस्तीत घुसून पाळीव प्राण्यांचा फडशा पाडत आहे. काही वेळा तर बिबट्यांकडून नागरिकांवर जीवघेणे हल्ले देखील होत आहेत. दौंड, शिरूर या तालुक्यात बिबट्यांच्या हल्ल्यात एक महिला व दोन मुलांना जीव गमवावा लागला आहे. दौंड, शिरूर, आंबेगाव, जुन्नर या पुणे जिल्ह्यातील तालुक्यात बिबट्यांनी उच्छाद मांडला असून या भागात बिबट्यांची मोठी दहशत निर्माण झाली असून नागरिक भयभीत झाले



आहे त्यामुळेच या नरभक्षक बिबट्यांना वन विभागाने ठार करावे अशी मागणी नागरिक करत आहेत अर्थात नरभक्षक बिबट्यांना ठार करणेच योग्य. याआधीही वन विभागाकडून नरभक्षक बिबट्यांना ठार मारण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी जळगाव जिल्ह्यात एका नरभक्षक बिबट्याने उच्छाद मांडला होता. या नरभक्षक बिबट्याला वन विभागाकडून ठार मारण्यात आले होते. राज्यातील ग्रामीण भागासह शहरी भागातही बिबट्यांचा वावर वाढल्याने बिबट्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे पण बिबट्यांना नागरी वस्तीत घुसखोरी का करावी लागते याचाही विचार आपण करायला हवा. बिबट्यांचा जो नैसर्गिक अधिवास समजला जातो ते जंगल आज राहिले नाही. माणसांनी स्वतःच्या फायद्यासाठी जंगलतोड केली. बिबट्यांना लपण्यासाठी जी झाडे झुडपे होती त्याची कत्तल माणसांनी केली त्यामुळे बिबट्यांना नैसर्गिक अधिवास राहिला नाही. माणसांनी बिबट्यांच्या नैसर्गिक अधिवासात अतिक्रमण केले. माणसांनी बिबट्यांचा निवारा हिसकावून घेतला. माणसानेच आधी बिबट्याच्या निवाऱ्यात घुसखोरी केली त्यामुळे बिबट्याही आता नागरी वस्तीत घुसखोरी करीत आहेत. बिबट्यांनी जर नागरी वस्तीत घुसखोरी करू नये असे आपल्याला वाटत असेल तर बिबट्यांना पुन्हा त्याचा नैसर्गिक अधिवास मिळवून द्यायला हवा. यासाठी वन विभागाने ठोस उपक्रम राबवायला हवेत. जंगलतोड थांबवायला हवी. वृक्षतोड थांबवायला हवी. वन विभागाने वृक्षारोपण मोहीम राबवून ते वृक्ष जगवले पाहिजे. जंगलामध्ये रानावनामध्ये झुडपांची लागवड केली पाहिजे जर बिबट्यांना लपण्यासाठी झाडे झुडपे मिळाली तर ते शेतामध्ये येणार नाहीत. बिबट्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवास मिळाला तर बिबटे नागरी वस्तीत घुसखोरी करणार नाहीत.

-श्याम ठाणेदार, पुणे

# उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते सेवानिवृत्त १३ कर्मचाऱ्यांचा सन्मान



**ठाणे (रोहित जैसवाल) -** जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने प्रत्येक महिन्यात आनंददायी निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने डिसेंबर महिन्यात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आज, दि. ०६ जानेवारी २०२५ रोजी, जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला.जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे यांच्या शुभहस्ते १३ अधिकारी व कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह, पेन्शन आदेश देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करून पुढील आयुष्याकरिता सदिच्छा दिल्या. त्याचबरोबर ग्रामीण भागात ३५ वर्ष पेक्षा अधिक काळ कामकाज केल्याबद्दल अभिनंदन केले. आरोग्य, शिक्षण तसेच विविध शासकीय योजना ग्रामस्थापर्यंत पोहोचवण्यासाठी सेवानिवृत्त कर्मचारी यांनी मोलाचे कामकाज केले आहे. तसेच इच्छूक शिक्षकांनी अनुभवाचा विद्यार्थ्यांसाठी वेळ खर्च करण्यासाठी शिक्षण विभागात काम करू शकता असे आवाहन यावेळी केले.

प्राथमिक शिक्षिका जान्हवी महाकाळ यांनी जिल्हा परिषदेत सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार कार्यक्रम नियोजन केल्याबद्दल आभार व्यक्त केले. ३५ वर्ष शिक्षक म्हणून कामकाज करता कुटुंब सदस्य तसेच सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.



यावेळी लेखाधिकारी शालेय पोषण आहार शिक्षण (प्राथमिक) विभागातील स्मिता नेरपगार, सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी कल्पना तोरवणे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी मनोज देवकर तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. डिसेंबर महिन्यातील शिक्षण विभाग प्राथमिक ११, सामान्य प्रशासन विभाग ०१, आरोग्य विभाग ०१ असे एकूण १३ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक, पदविधर, हवालदार, आरोग्य सहाय्यक पुरुष या पदावरील अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत.

## पान १ वरून...

### धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडमुळेच...

एकवेळ बजरंग सोनावणे हे धनंजय मुंडे यांच्या अत्यंत जवळचे मित्र होते. पण वाल्मिक कराड आणि विष्णू चाटेमुळे ते मुंडेंपासून दूर गेले. विष्णू चाटेला तालुका अध्यक्ष करायची गरज काय होती? बजरंग सोनवणेसारखा तगडा उमेदवार समोर असल्यानेच पंकजा यांचा पराभव झाला. ते बाजूला गेले नसते तर पंकजा मुंडे कधीच पडल्या नसत्या.”पंकजा मुंडे यांचा पराभव हा धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडच्या दहशतीमुळे, त्यांच्या वागण्यामुळे झाला असा आरोप यावेळी सुरेश धस यांनी केला. धनंजय मुंडे यांची परळीत दहशत नाही, पण वाल्मिक कराडची आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडमुळे अनेकजण पंकजा मुंडेंवर नाराज झाले. त्याचा परिणाम हा लोकसभेच्या निवडणुकीत झाला. पंकजा मुंडे यांना माझ्या मतदारसंघातून ३१ हजारांचे लीड मिळाले. परळीमधून ७३ हजारांचे लीड मिळाले. पण एकट्या बीड तालुक्यातून त्या ९८ हजारांनी मागे पडल्या असं सुरेश धस म्हणाले. पंकजा मुंडेंना हे सर्व माहिती आहे. पण त्या थेट बोलू शकत नाही. म्हणून मी हे बोलतोय असंही सुरेश धस म्हणाले. आम्ही प्रामाणिक काम केलं. पण लोकसभेचा पराभव आमच्यामुळे झाला असं सांगत जबाबदार ठरवण्यात आलं. त्यामुळेच विधानसभेला आमच्याविरोधात पंकजा मुंडे यांनी उमेदवार दिला असल्याचं सुरेश धस म्हणाले. बीड प्रकरण हे गंभीर असून त्याविरोधात आवाज उठवणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या जीवाला धोका आहे. त्यामुळे त्यांना संरक्षण देण्यात यावं अशी मागणी शरद पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. त्यावर प्रतिक्रिया देताना सुरेश धस म्हणाले की, मी कुणालाही घाबरत नाही. मला कुठल्याही संरक्षणाची गरज नाही. पण जे लोकप्रतिनिधी या विरोधात आवाज उठवतात त्यांच्या कुटुंबीयांना संरक्षण दिली जावी.

### मुंबई महानगर क्षेत्रात ‘केबल कार’...

मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्यादृष्टीने या प्रकल्पाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पालघर पासून रायगड जिल्ह्यातील उरण-पेणपर्यंत पसरलेल्या एकूण क्षेत्रामध्ये नागरिकरणाचा वेग वाढत आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील वाढते नागरीकरण, वाहनांची वाढती संख्या, नवीन रस्ते व रेल्वे सेवा, प्रदूषण याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन आधुनिक तंत्रज्ञान व पाश्चात देशातील यशस्वी नाविन्यपूर्ण प्रकल्पाचा अभ्यास करून वाहतूक समस्या सोडवण्यासाठी ठोस प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. मुंबई महानगरास प्राप्त झालेले महत्त्वपूर्ण भौगोलिक स्थान, सागरी किनारा खाडीचा प्रदेश, एलिफंटासारखी प्राचीन लेणी, माथेरानसारखे थंड हवेचे पर्यटन स्थळ, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, तुंगारेश्वर वन्यजीव अभयारण्यासारखी हरित चादर जतन करून मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वाहतूक व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी ‘रोपवे’च्या माध्यमातून ‘केबल कार’ प्रकल्प राबवणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी व्यक्त केले आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात...

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, विद्यार्थी हा जीवनभर विद्यार्थी राहिला पाहिजे. वयाच्या पन्नाशीनंतरही शिकत राहण्याची वृत्ती कायम राहिली पाहिजे. शिकत असताना त्यात्या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींसोबत काम केले पाहिजे. त्यांच्याकडून व्यवसायातील बारकावे समजून घेतले पाहिजेत. जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघितलं पाहिजे. आज विधी शाखेचे विद्यार्थी असलेले तुम्ही सर्वजण उद्या यशस्वी वकील बनाल, परंतु वकिल बनण्याआधी आजचे आदर्श विद्यार्थी, उद्याचे आदर्श नागरिक बना, असं आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विद्यार्थ्यांना केलं.

राजकारण, समाजकारण, अर्थकारण, कला, क्रीडा, साहित्य अगदी वकिलीच्या क्षेत्रात टिकून राहण्यासाठी स्वत:ला सातत्याने सिद्ध करत रहावे लागते. स्वत:ला सिद्ध करण्यासाठी प्रचंड अभ्यास, अथक परिश्रम आणि चिकाटी आवश्यक असते. त्याची तयारी ठेवा. देशाचं संविधान तसेच कायद्यांनी सोपवलेली जबाबदारी प्रामाणिकपणे, निर्भयपणे, निष्पक्षपणे, निष्ठेने पार पाडण्याचा प्रयत्न करा, असे मार्गदर्शनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विद्यार्थ्यांना केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध विषयांवरच्या प्रश्नांना उपमुख्यमंत्र्यांनी दिलखुलास उत्तरे दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबरोबरच्या संवादातून राज्याचा लोकनेता, कुटुंबातील ज्येष्ठ मार्गदर्शक, एका दिलखुलास मित्राचे दर्शन घडले, अशी भावना संवादात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. सागर खुरवड, महादेव पाटील, अनुज बसाळे, अमित काकडे, शंतनु दाते, हरिष मिनेकर आदी विद्यार्थी, प्रतिनिधींसोबत पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी या संवादात सहभाग घेतला.

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना धमकी...

यानंतर परेश चाळके यांची तक्रार नोंदवून घेत पोलिसांनी हितेश प्रकाश धेंडे (२६) या तरुणाविरोधात गुन्हा दाखल केला.हितेश हा वागळे इस्टेट येथील वारळीपाडा परिसरात राहतो. हा परिसर शिंदे यांच्या कोपरी पाचपाखाडी मतदार संघात येतो. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी हितेशचा शोध सुरू केला होता. दरम्यान, सोमवारी सकाळी पोलिसांनी शोध घेऊन त्याला अटक केली. त्याने असे कृत्य का केले, हे अद्याप समजू शकलेले नसून पोलिस त्याचा तपास करित आहेत. या संदर्भात वागळे परिमंडळाचे पोलिस उपायुक्त प्रशांत कदम यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी धमकी देणाऱ्या तरुणास अटक केल्याच्या वृत्तास दुजोरा दिला. तसेच त्याने असे कृत्य का केले, हे अद्याप समजू शकलेले नसून त्याचा तपास सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### कुणाचा तरी राजीनामा घेऊन मला मंत्रिपद...

तसेच राजकारणात कुणावर अन्याय होता कामा नये. जर कुणी दोषी असेल तर शिक्षा झाली पाहिजे. जो खून झाला तो अतिशय भयंकर आहे. आमदार धस ज्याप्रकारे सांगतायेत. बाहेर ऐकतोय ते ऐकल्यानंतर अंगावर शहारे येतात. असा खून होणे कल्पनाच करवत नाही. जे दोषी असतील त्यांना फाशी व्हायलाच हवी. परंतु कारण नसताना कुणावर तरी अन्याय होता कामा नये असे मला वाटते असंही भुजबळांनी सांगितले. दरम्यान, जरांगे जे काही बोलतायेत ते योग्य नाही. ही लोकशाही आहे ठोकशाही नाही. दोषी असेल तर कारवाई होईल. तुम्ही कायदा हातात घेण्याचं कारण नाही. जरांगेंच्या बाबतीत बोलायचं झाले तर मुंडे चार पाच वेळा त्यांचे उपोषण सोडवायला गेले होते. त्यामुळे ते एकमेकांना ओळखतात. ते पाहून घेतील. खून अतिशय वाईटरित्या झाला पण हे प्रकरण शांततेने घेतले पाहिजे. चौकशी होऊ द्या. कार्यकर्त्यांच्या डोक्यात काय चाललं हे आम्हाला कळत नाही ना, कार्यकर्ते चांगले काम करतात त्यांना मानसन्मान दिला जातो. मला कुणाची बाजू घ्यायची नाही परंतु जे काही असेल चौकशीत समोर येऊ द्या असंही छगन भुजबळांनी म्हटलं.

### H M P V संदर्भात राज्य मंत्रिमंडळाच्या...

कर्नाटकातील बंगलोर मधील हॉस्पिटलमध्ये आठ महिन्याच्या मुलींमध्ये HM P V व्हायरसची लक्षणे आढळून आली आहेत मात्र एका खाजगी प्रयोगशाळेत मुलीला संसर्ग झाल्याची पुष्टी झाली आहे कर्नाटक आरोग्य विभागाचे म्हणणे आहे की त्यांच्या प्रयोगशाळेत नमुन्याची चाचणी झाली नाही एका खाजगी रुग्णालयाच्या अहवालाची बाब समोर आली आहे ट्रेन बाबत कोणतीही माहिती नाही नमुने शासकीय प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत सरकारने व्हायरस बाबत अलर्ट जारी केला आहे व दक्षता देखील घेतली गेली आहे आंध्रप्रदेश सरकारने H M P V भारत बाबत अलट जारी केला आहे के पद्मावती सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण आंध्र प्रदेशचे संचालक म्हणाले की विषाणू कोविड १९ प्रमाणेच एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हा विषाणू पसरतो हे प्रामुख्याने लहान मुले वृद्ध आणि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींना प्रभावित करते आंध्र प्रदेश मध्ये H M P v कोणतेही प्रकरण अद्याप नोंदवलेले गेले नाही याबाबत सध्या काळजी करण्याची गरज नाही एचएमटीव्ही चा संसर्ग झालेल्या व्यक्तींच्या जवळच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींना विषाणूचा संसर्ग होण्याचा धोका असतो ते म्हणाले की खोकला ,शिंकणे स्पर्श करणे ,आणि बाधित व्यक्तीच्या हात मिळवणे याने हा आजार पसरतो या रोगाचा प्रामुख्याने मुलांवर परिणाम होतो तथापि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या वृद्ध लोकांवर याचा प्रभाव पाहण्यास मिळाला आहे या विषयांमुळे लोकांना सर्दी खोकला ताप आणि कप येण्याची तक्रार होऊ शकते अधिक गंभीर प्रकरणांमध्ये घशा आणि श्वसन मार्गाच्या अडथळयामुळे लोकांच्या तोंडातून शिट्टी सारखा आवाज देखील ऐकू येतो या विषाणूमुळे लोकांना ब्रोन कायलाइटिस (फुफुसात ऑक्सिजन वाहून नेणाऱ्या नळयांचा जळजळ) आणि न्यूमोनिया उपसात पाणी भरणे याचा त्रास होऊ शकतो यामुळे संक्रमित लोकांना रुग्णालयात दाखल करावे लागू शकते या रोगाची लक्षणे कोरोना व्हायरस संसर्ग आणि सामान्य सारखेच असल्याने दोघांमधील फरक सांगणे कठीण आहे परंतु जिथे प्रत्येक मोसमात कोरोना व्हायरस साठीचा रोग पसरतो तर H M P V हा रोग आत्तापर्यंत मुख्यतः हंगामी संसर्ग मानला जातो मात्र अनेक ठिकाणी त्याची वर्षभर उपस्थिती नोंदविण्यात आली आहे कोरोना व्यतिरिक्त या विषाणूमुळे वरच्या आणि खालच्या दोन्ही शोषण मार्गांमध्ये संसर्ग होण्याचा धोका असू शकतो सामान्य प्रकरणांमध्ये या विषाणूचा प्रभाव तीन ते पाच दिवस टिकतो सध्या या रोगापासून संरक्षण करण्यासाठी कोणतीही लस उपलब्ध नाही याशिवाय अँटीव्हायरस औषधाचा ही त्यावर परिणाम होत नाही अशा परिस्थितीत अँटीव्हायरल चा वापर मानवाची प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करू शकतो या विषाणू ने त्रस्त असलेले लोकांना लक्षणे कमी करण्यासाठी काही औषधे दिली जाऊ शकतात तथापि व्हायरस नष्ट करण्यासाठी अद्याप कोणत्याही उपचार उपलब्ध नाहीत यामुळेच राज्य सरकार अलर्ट मोडवर आले असून राज्याच्या आरोग्य सेवा संचालनालय पुणे यांनी ३ जानेवारी रोजी एक परिपत्रक काढून ते राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा शल्य चिकित्सक यांना पाठवले आहे यामध्ये त्यांनी काय करावे व काय करू नये याबाबत मार्गदर्शक तत्त्वांची अमोल बजावणी करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत त्यामध्ये त्यांनी हस्तांदोलन करू नये ,टिशू पेपर आणि रुमालाचा पुनर्वापर करू नये, आजारी लोकांशी जवळचा संपर्क करू नये, डोळे नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करू नये, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे टाळावे अशा सूचना राज्याच्या आरोग्य सेवा संचालनालय पुणे याचे संचालक डॉक्टर नितीन अंबाडेकर यांनी काढलेल्या परिपत्रकात स्पष्टपणे नमूद केले आहे एकंदरीत कर्नाटकामधील बंगळूर मधील सापडलेल्या या विषाणूजन्य रोगाच्या रुग्णांमुळे राज्यातील आरोग्य व्यवस्था देखील खडबडून जागे झाले असून त्यांनी एक परिपत्रक काढले असले तरी राज्यात पुन्हा एकदा covid सारखे परिस्थिती उद्भवू नये यासाठी राज्य सरकार उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीत नागरिकांना मास्क लावण्याबाबत अधिसूचना जारी करण्याबाबत तसेच गर्दीच्या ठिकाणी घ्यावयाची दक्षता व लसीकरणाबाबत कोणती उपाययोजना जारी करते याकडे उद्याच्या राज्य मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीत प्रामुख्याने निर्णय होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कोकण भवनात भारतीय प्रजासत्ताक दिन पूर्व तयारीची बैठक संपन्न



**नवी मुंबई (भावना जैन) :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने आज पूर्व तयारीची बैठक कोकण विभागाच्या सामान्य शाखेचे अपर आयुक्त संजीव पलांडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

कोकण भवनातील पहिला मजला, समिती सभागृह येथे झालेल्या या बैठकीत सिडको अग्निशमन विभागाचे मुख्य अधिकारी विजय राणे, उद्यान अधीक्षक विशाल भोर, पनवेल महानगर पालिकेचे दशरथ भंडारी,नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या सुलभा बारघरे,रायगड विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता एस.डी कट्टी,बृहन्मंबई राज्य कर्मचारी संघटनेचे उपाध्याक्षा श्रीम. अस्मिता जोशी, कोकण भवन विद्युत विभागाचे उप अभियंता प्रविणकुमार शिवदास, कोकण विभागातील विविध विभागातील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावरील भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७६ वा वर्धापन दिन समारंभ दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ०९.१५ वाजता साजरा होणार आहे.मुख्य शासकीय ध्वजारोहण कळंबोली पोलीस मुख्यालय मैदानावर होणार आहे. त्या अनुषंगाने बैठकीत मार्गदर्शन करताना श्री. पलांडे यांनी कोकण भवनातील सर्व विभागाने हा सोहळा यशस्वीरित्या व उत्साहात साजरा करण्याबाबत सूचना दिल्या. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी आणि हा कार्यक्रम उत्साहात साजरा करावा, असे सांगून सर्वांनी शासकीय पोशाखात कार्यक्रमास उपस्थित राहावे. असे त्यांनी यावेळी सांगितले.

# चर्मकार समाजाचे उपोषण मागे



**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोर आज पासून आमरण उपोषण पुकारण्यात आले होते. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी चर्मकार समाजाच्या शिष्टमंडळाला त्यांच्या मागण्याबाबत बोलवून घेऊन सविस्तर चर्चा केली व अधिकृत परवानाधारक गटई कामगार यांना काढण्यात आलेली बेकायदेशीर नोटीस त्वरित मागे घेण्यात यावी व कुठल्याही गटई कामगारावरती तोडक कारवाई करू नये असे सर्व प्रभागक्षेत्र अधिकारी यांना आदेशित करण्यात आले.

महापालिकेने केलेल्या अन्यायकारक कारवाईमुळे बाधित गटई कामगारांचे आठ दिवसांमध्ये पुनर्वसन करावे असे आदेश मालमत्त विभागाच्या सहाय्यक आयुक्त सविता हिले यांना देण्यात आले व यापुढे अशी चूक होणार नाही अशी सर्वांनी खबरदारी घेण्यात यावी अशा सर्व अधिकाऱ्यांना सुचीत करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष राम बनसोडे, माजी नगरसेवक भिमराव डोळस, कल्याण डोंबिवली जिल्हा अध्यक्ष भैरवनाथ वाघमारे, कल्याण डोंबिवली जिल्हा महिला अध्यक्ष मंगला गायकवाड, ठाणे जिल्हा सरचिटणीस गजेंद्र राऊत, जिल्हा सचिव हनुमंत गायकवाड, कल्याण गायकवाड व अनेक कार्यकर्ते पदाधिकारी समाज बांधव उपस्थित होते.

चर्मकार समाजाच्या सर्व मागण्या मान्य झाल्याने राम बनसोडे यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाचे आभार मानून आपले उपोषण मागे घेतले.

# इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने घेतली रेयांश खामकरच्या पराक्रमाची दखल



**ठाणे (रोहित जैसवाल) -** ठाण्यातील स्टारफिश स्पोर्टर्स फाऊंडेशनचा ६ वर्षीय जलतरणपटू रेयांश सानिका दिपक खामकर याने विजयदुर्ग येथील अरबी समुद्रात मालपे जेट्टी ते वाघोटन जेट्टी हे १५ किलोमीटरचे आव्हानात्मक सागरी अंतर तीन तासात पोहून पार केले आहे. १५ कि.मीचे अंतर पार करणारा रेयांश खामकर हा सर्वात लहान जलतरणपटू ठरला असून त्याची दखल इंडिया बुक रेकॉर्डने घेतली आहे, याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. सांस्कृतिक कार्य तसेच माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार, ठाणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेचे अध्यक्ष ॲड. निरंजन डावखरे, महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेचे उपाध्यक्ष श्री राजेश मोरे यांनी देखील रेयांशचे अभिनंदन करुन त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.रेयांश खामकर हा स्टारफिश स्पोर्टस फाऊंडेशनच्या माध्यमातून जलतरणाचे धडे प्रशिक्षक कैलास आखाडे यांच्याकडून घेत असून तो ठाणे महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव येथे दररोज सराव करीत आहे. रेयांश हा ठाण्यातील नौपाडा येथील सरस्वती इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असून त्याच्या या विक्रमाबद्दल त्याचे शाळेनेही कौतुक केले आहे. गेल्या वर्षभरात विविध स्पर्धामध्ये रेयांशने १३ पदके प्राप्त केली असून यात ५ सुवर्ण, ५ रौप्य व ३ कांस्य पदकांचा समावेश आहे.

# कल्याण पूर्वेतील घटनेच्या निषेधार्थ वकिलांचा मोर्चा




**कल्याण (विवेक गुंजाळ) :** कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातील सर्व महिला वकिलांच्या नेतृत्वाखालीकल्याण पूर्वेतील तेरा वर्षीय बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या निषेधार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून तहसीलदार कार्यालयापर्यंत निषेध मोर्चा काढण्यात आला. नाबालीक मुलीवर झालेल्या अत्याचार व खुनाचा गुन्हा प्रकरणात आरोपीच्या विरुद्ध लवकरात लवकर केस चालवुन आणि कायद्याच्या तरतुदीअनुसार जास्तीत जास्त शिक्षा फाशिची शिक्षा करण्याची मागणी या वकिलांनी केली.

कोळशेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिची निघृण हत्या करण्यात आली. त्या संदर्भात वकील म्हणुन निषेध व्यक्त करण्यात आला. गुन्हयामध्ये सर्व आरोपींच्या विरुध्द लवकरात लवकर फास्टट्रॅकवर दररोज केस चालवुन सर्व आरोपींना कायद्यातील तरतुदीप्रमाणे जास्तीत जास्त शिक्षा फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. कल्याण डोंबिवली महानगरपालीका क्षेत्रात गुन्हेगारी प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. मागील दोन तीन महिन्यात खुनाचे प्रमाण वाढलेले आहे. त्याचप्रमाणे कायद्याची भीती राहिलेली नसल्यामुळे महिला बालीकांवरील अत्याचार आणि हत्यांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

प्रशासनाने याची योग्य ती दखल घ्यावी, अशा प्रकारचे गुन्हे होणार नाहीत याची दक्षता पोलीस प्रशासनाने घेतली पाहिजे. गस्ती पथकांची संख्या वाढवुन गुन्हेगारी नियंत्रणात आली पाहिजे अशी मागणी या वकिलांच्या वतीने करण्यात आली. यावेळी कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश जगताप, नवीन सिंग, विजय जाधव, माया कदम, सुवर्णा सागर, राजश्री आव्हाड, निलम पाटील, हरीष सरोदे आदींसह इतर अनेक वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.







ठाणे महापालिका आणि ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार दिनाच्या निमित्ताने महापालिका मुख्यालयातील पत्रकार कक्ष येथे छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.तद्नंतर, कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ, रोटरी क्लब आणि इशा नेत्रालय यांच्यावतीने आयोजित नेत्रशिबिरास अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी यांनी भेट दिली. त्यावेळी, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे यांच्यासह संघाचे पदाधिकारी आणि पत्रकार उपस्थित होते.

# आरोग्याचा संदेश देत पोलीस रेझिंग सायकल राईड संपन्न






**ठाणे (विशाल कारंडे) :** फिट राहा हिट राहा म्हणत रविवारी सकाळी पोलीस रेझिंग डे निमित्त सायकल राईड संपन्न झाली.

या सायकल राईड मध्ये साडेचारशे हून अधिक सायकल प्रेमी सहभागी झाले होते. चार वर्षांच्या चिमुकली पासून ते ७२ वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत सर्व सायकल प्रेमींनी सहभाग घेत आरोग्याचा संदेश ठाणेकरांना दिला.

यंदाच्या सायकल राईडची थीम ही राईड फॉर हेल्थ अशी होती. नौपाडा पोलीस स्टेशन ठाणे आणि आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चिंतामणी चौक पासून सायकल राईट आयोजन करण्यात आले होते. अनुभवी सायकलिंग प्रेमी साठी लांब पडल्याची राईड आणि हौशी सायकल प्रेमींसाठी जॉईराईड अशा दोन प्रकारात संपन्न झाली. यावेळी वाहतूक विभागाचे सह पोलीस आयुक्त विजयसिंह भोसले, नौपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन, शिवसेना निवडणूक विभागाचे महाराष्ट्र राज्य समन्वयक विलास जोशी,

आम्ही cycle प्रेमी फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे, सचिव दीपेश दळवी, पोलीस निरीक्षक रोहिणी सोनार , गौरी मोरे, सामाजिक कार्यकर्ते

महेंद्र मोने आदी व्यासपीठावर उपस्थित होते. फिट राहा हिट राहा सायकलिंग करत रहा असा संदेश देत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन म्हणाले की, सध्याच्या काळात मैदानी खेळ राहिले नाहीत त्यामुळे शारीरिक व्यायाम करून तंदुरुस्त राहणे हे आताच्या काळात महत्त्वाचे आहे त्यामुळे सायकलिंग जॉगिंग वॉकिंग यांसारखे काही ना काही शारीरिक व्यायाम करत रहा. आपले आरोग्य सुदृढ ठेवा असे सांगितले. सहभागी सायकल प्रेमींना जर्सी आणि आकर्षक मेडल देण्यात आले. या राईडमध्ये चार वर्षीय जिज्ञासा कुंभार आणि ७० वर्षीय दुर्गा गोरे या सायकल प्रेमींनी विशेष लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाचे निवेदन अजय नाईक यांनी केले. या सायकल राईडचे नेतृत्व गणेश कोळी, गिरीश चिलकेवार, दिलीप तळेकर, गजानन दांगट, विनोद फर्डे, संकेत सोमणे, पंकज रिजवानी आदींनी केले.

या सायकल राईड मध्ये ठाणे सह मुरबाड, खारघर, वसई विरार, पनवेल, कर्नाळा, कल्याण डोंबिवली यांसारख्या विविध भागातून आले होते.

# रस्त्यावर तेल सांडल्याने पाच दुचाकी घसरून अपघात


**ठाणे (विशाल पाटील) :** ठाणे येथील नौपाडा भागात बी केबिन परिसरात सोमवारी पहाटे रस्त्यावर तेल सांडले होते. रस्त्यावर सर्वत्र पसरलेल्या या तेलावरून पाच दुचाकी घसरल्या आणि तोल जाऊन दुचाकीस्वारखाली पडले. सुदैवाने या अपघातात कोणीही जखमी झालेले नाही.ठाणे येथील नौपाडा भागात बी केबिन परिसर येतो. या भागातून ठाणे स्थानक परिसराकडे रस्ता जातो. यामुळे या रस्त्यावर वाहनांची सतत वर्दळ असते. सोमवारी पहाटे ६.४० वाजता या रस्त्यावर तेल सांडले होते. हे तेल रस्त्यावर सर्वत्र पसरले होते.सकाळच्या वेळेत येथून जात असलेल्या दुचाकी घसरल्या आणि दुचाकीस्वार खाली पडले. पाच दुचाकी घसरून अपघात झाला. यात कुणालाही दुखापत झाली नाही. याबाबत नागरिकांनी माहिती देताच नौपाडा पोलीस स्थानकाचे पोलीस कर्मचारी तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी रस्त्यावर सांडलेल्या तेलावर माती टाकली आणि त्यानंतर हा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.



महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे अध्यक्ष तथा सेन्ट्रल रेल्वे कमिटी सदस्य ZRUCC Member अभिजीत धुरत*यानी आज ६ जानेवारी २०२५ रोजी अंबरनाथ रेल्वे स्टेशनला येऊन स्टेशन मॅनेजर रामेश्वर प्रसाद मीना जी, उपस्टेशन मॅनेजर कुरेशी जी, निरंजन कुमार चव्हाण याची भेट घेतली, यावेळी अंबरनाथ महिला पदाधिकारी आशाताई शाह तसेच पदाधिकारी कार्यकते व मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी उपस्थित होते.

# शाहरुख खानची 'मन्नत' पूर्ण

## बंगल्याचे दोन मजले वाढवण्यास पर्यावरण विभागाची मंजुरी



सुप्रसिद्ध अभिनेता शाहरुख खान याच्या वांद्रे येथील मन्नत बंगल्यावर आणखी दोन मजले वाढणार आहेत. राज्याच्या पर्यावरण विभागाने नुकतीच याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे बंगल्याच्या विस्तारिकरणाची शाहरुखची 'मन्नत' अखेर पूर्ण होणार आहे. बॉलिवूडचा स्टार असलेल्या शाहरुख खानचा वांद्रे येथील बंगला नेहमीच चर्चेत असतो.

माउंट मेरी कडे जाणाऱ्या रस्त्यावरचा हा बंगला शाहरुखच्या चाहत्यासाठीही आकर्षणाचा विषय आहे. सध्या सहा मजल्यांचा असलेला हा बंगला आता लवकरच आणखी उंच होणार आहे. या बंगल्याच्या वर आणखी दोन मजले वाढण्यासाठी महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (एमसीझेडएमए) नुकतीच परवानगी दिली आहे. शाहरुखची पत्नी गौरी खान हिने या परवानगीकरिता संबंधित विभागाकडे अर्ज केला होता. वांद्रे पश्चिम येथील पालिकेच्या एच पश्चिम विभागाच्या अखत्यारीत येणारा मन्नत या बंगल्याचे आता आणखी विस्तारिकरण करून त्यात काही बदल करण्यात येणार आहेत. या सहा मजली बंगल्याला २००२ मध्ये आयओडी तसेच २००६ मध्यवं भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यानंतर बंगल्यामध्ये तळघरात दोन मजले आणि जलतरण तलाव बांधण्यात आला व त्यालाही भोगवटा प्रमाणपत्र व सीआरझेड परवानगी मिळालेली आहे.

# देवाचं घर म्हणजे काय? उत्तर मिळणार ३१ जानेवारीला




देवाचं घर म्हणजे काय? ते नक्की कुठे असतं? या एका लहान मुलीला पडलेल्या प्रश्नाचं उत्तर "मुक्काम पोस्ट देवाचं घर" या चित्रपटातून मिळणार आहे. या चित्रपटाचा हृदयस्पर्शी टीजर नुकताच लाँच करण्यात आला असून, हा चित्रपट ३१ जानेवारी रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. आपण पाठवलेलं पत्र अमेरिकेला पोहोचतं, तर देवालाही पत्र पोहोचेल अशा अनोख्या कल्पनेतून सुरू होणाऱ्या टीजरमुळे "मुक्काम पोस्ट देवाचं घर" मनाला भिडणारी गोष्ट नक्कीच सांगणार असल्याचा अंदाज देतो. एका लहान मुलीला पडलेल्या प्रश्नाचं काय उत्तर असेल याचा शोध या चित्रपटातून घेण्यात आला आहे. तसेच दरम्यान तिच्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींची जोडही देण्यात आली आहे. अतिशय हलक्याफुलक्या पद्धतीनं ही गोष्ट उलगडणार असून सहकुटुंब हा चित्रपट पाहता येणार आहे. त्यामुळे "मुक्काम पोस्ट देवाचं घर" हा चित्रपट येत्या ३१ जानेवारीपासून चित्रपटगृहात जाऊनच पाहायला हवा यात शंका नाही.



## नवरी मिळे हिटलरला या मालिकेत नवीन वर्षात नवीन धमाके

'नवरी मिळे हिटलरला' मालिकेत नवीन वर्षात नवीन धमाके होणार आहेत ज्याची सुरुवात जहागीरदारांच्या न्यू इयर पार्टी मध्येच सुरु झाली आहे. एजेला अखेर जाणीव झालेय की त्याचं लीलावर प्रेम आहे. लीला एजेसाठी चहा बनवत असताना दुर्गा येऊन एजेची चहा बनवायची पद्धत वेगळी असल्याचं लीलाला सांगते. लीला तीच न ऐकता स्वतःच्या पद्धतीनी चहा बनवून एजेला देते. एजे चहा पिताना लीला म्हणते, "तुम्ही माझं हृदय जिंकलंय, आता माझ्यासाठी काहीतरी खास करा." हे सर्व पाहून दुर्गाला येतो. एजे विश्वाला आयडिया विचारण्यासाठी कॉल करतो, पण सर्व आयडिया नाकारतो. त्याच्या खोलीत एजे एका पांढऱ्या गुलाबांच्या बुकेसह उभा आहे आणि लीला हे पाहून खुश होते.

# आमिर खानच्या मुलाने 'लापता लेडीज'साठी दिली होती ऑडिशन

आमिर खानचा मुलगा अभिनेता जुनैद खानने २०२४ मध्ये 'महाराज' या चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण केले. या चित्रपटातील त्याची आणि अभिनेत्री शर्वरी वाघची केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस पडली होती. यशराज फिल्म्सच्या 'महाराज' या चित्रपटात झळकण्याआधी, जुनैद खानने त्याच्या वडिलांच्या आणि सावत्र आई किरण रावच्या चित्रपटांसाठी ऑडिशन दिले होते. जुनैदने त्याच्या वडिलांचा 'लाल सिंग चड्ढा' आणि सावत्र आई किरण रावचा 'लापता लेडीज' या दोन चित्रपटांसाठी ऑडिशन दिले होते.

यूट्यूबवरील विकी लालवानीच्या चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत जुनैदने या अनुभवांबद्दल माहिती दिली. बजेटची मर्यादा आणि योग्य कास्टिंगसाठीचा शोध या गोष्टींनी या निर्णयांवर कसा परिणाम केला हे त्याने उलगडून सांगितले.




जुनैदने सांगितले की, त्याने आणि किरण रावने 'लाल सिंग चड्ढा'साठी आई-मुलाच्या भूमिकेसाठी एकत्रित ऑडिशन दिले होते. तो म्हणाला, "मी तुम्हाला 'लाल सिंग चड्ढा' मध्ये दिसलो असतो, कारण मी आणि किरण रावने त्यासाठी चाचणी दिली होती. यात किरण माझी आई बनली होती. आम्ही चित्रपटासाठी सात-आठ दृश्ये चित्रीत केली, जवळपास २० मिनिटांचे फुटेज तयार झाले. ही माझ्यासाठीदेखील एक चाचणी होती. पप्पा मला मी चित्रपटाच्या प्रक्रियेशी कसे जुळवून घेतो हे पाहू इच्छित होते. पण, शेवटी मुख्यतः बजेटच्या कारणामुळे ते शक्य झाले नाही. नवीन व्यक्तीसाठी अशा महागड्या चित्रपटात काम करणे कठीण होते."

जरी त्याला भूमिका मिळाली नाही तरी या अनुभवामुळे जुनैदला त्याच्या वडिलांबरोबर जवळून काम करण्याची संधी मिळाली. आमिर खानने या चित्रपटाची सहनिर्मिती केली होती. १९९४ च्या 'फॉरेस्ट गंप' या अमेरिकन सिनेमाचा हा भारतीय रिमेक होता.

'लाल सिंग चड्ढा' व्यतिरिक्त जुनैदने किरण रावच्या 'लापता लेडीज' या चित्रपटाच्या मुख्य भूमिकेसाठीदेखील ऑडिशन दिले होते. त्या अनुभवाबद्दल तो म्हणाला, "'लापता लेडीज'चा अनुभव खूप वेगळा होता. मी त्यासाठी स्क्रीन टेस्ट दिली होती. पण, किरणने मला सांगितले की 'या भूमिकेसाठी स्पर्श श्रीवास्तव जास्त योग्य आहे' आणि मी तिच्याशी सहमत आहे. तो त्या भूमिकेसाठी अधिक चपखल होता."

या निर्णयामुळे त्यांच्या नातेसंबंधांवर परिणाम झाला नाही. याबाबत जुनैद म्हणाला, "आमचं नातं खूप चांगलं आहे. किरण खूप मजेशीर आणि प्रेमळ व्यक्ती आहे, आमचं खूप छान जमून येतं."

भारतीय ग्रामीण भागाच्या पार्श्वभूमीत घडणारा 'लापता लेडीज' हा एक व्यंगात्मक कॉमेडी-ड्रामा आहे. हा चित्रपट लग्नसोहळ्यात झालेल्या गोंधळावर आधारित आहे, जिथे दोन नवविवाहित वधू ट्रेन प्रवासादरम्यान अचानक गायब होतात. त्यानंतर त्यांच्या शोधासाठीची गमतीदार आणि गोंधळात टाकणारी कथा पुढे उलगडते.

किरण रावने दिग्दर्शित केलेल्या आणि आमिर खान निर्मित या चित्रपटात स्पर्श श्रीवास्तवसह अनेक प्रतिभावान कलाकार झळकले आहेत. 'लापता लेडीज'ला भारताकडून ऑस्करसाठी अधिकृत प्रवेशिका म्हणून पाठवण्यात आले होते, पण या चित्रपटाला ऑस्करमध्ये अंतिम नामांकनाच्या यादीत स्थान मिळाले नाही.

## सोनू निगमने मराठी गाण्याने केली नवीन वर्षाची सुरुवात




सोनू निगमने आपल्या गाण्याने श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. सोनू निगमच्या मधुर आवाजाने श्रोते मंत्रमुग्ध होतात. रोमँटिक गाणे असो की भावनिक गाणे सोनू निगम त्याच्या जादुई आवाजाने ते गाणे सुंदर बनवतो. बॉलीवूड सिनेमांसह सोनूने अनेक भाषांत गाणी गायली आहेत. सोनू निगमने मराठीतही अनेक गाणी गायली आहेत. सचिन पिळगावकर यांच्या' नवरा माझा नवसाचा' या सिनेमात त्याने गायलेले 'हिरवा निसर्ग' हे गाणे आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहे. आता सोनूचे नवे मराठी गाणे प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे. सोनू निगमने नववर्षाची सुरुवात मराठी गाण्याने केली आहे. शंकर एहसान लॉय यांनी संगीतबद्ध केलेले, आगामी मराठी चित्रपट 'संगीत मानापमान' सिनेमातले 'चंद्रिका' हे गाणे सोनू निगमने आपल्या सुमधुर आवाजाने गायले आहे. हे गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. गायक सोनू निगमने पहिल्यांदाच अशा प्रकारचे गाणे एका मराठी सिनेमासाठी गायले आहे असे त्याने सांगितले. 'चंद्रिका' या गाण्याविषयी बोलताना सोनू निगम म्हणाला, 'असं गाणं मी कदाचित आतापर्यंत कोणत्याही चित्रपटासाठी गायलं नसेल, हे गाणं खूपच वेगळं आहे, हे गाणं जेव्हा मी पहिल्यांदा ऐकलं तेव्हा माझ्या मनात एका मंदिरात असतं तसं वातावरण तयार झालं, परंतु हे एक डिव्होशन सोंग (भक्ती गीत) नसून प्रेमाचं गीत आहे. प्रेमा मध्ये सुद्धा भक्ती आहे, मी ह्या गाण्यासाठी स्वतःला पूर्णपणे समर्पण केलं आहे. देवाचे आभार आहेत की मला अशा प्रकारचं गाणं गाण्याची संधी मिळाली."हे गाणे ऐकायला जितके छान आहे तितकेच या गाण्याचे सुरेख चित्रीकरण झाले आहे. सुबोध भावे आणि वैदेही परशुरामीवर हे गाणे चित्रित करण्यात आले असून 'चंद्रिका दव रूपाने या धरतीवर अवतरली' असे या गाण्याचे बोल आहेत. सुबोध भावे आणि वैदेही परशुरामी यांचा वनामध्ये (जंगलात) निसर्गाच्या सानिध्यात झालेला रोमान्स याचे सुंदर चित्रीकरण यात करण्यात आले आहे. सोनू निगमच्या सुरेख आवाजाबरोबर शंकर एहसान लॉय यांचे संगीत आणि त्याच्या जोडीला समीर सामंत यांच्या गीताने हे सुंदर गाणे तयार झाले आहे. सोनू निगमने मराठी संगीत आणि मराठी गायक या विषयी सुद्धा आपले मत मांडत त्याचा आवडता मराठी गायक कोण ह्याची माहिती दिली.

# सेलिब्रिटी जोडप्याची लगीनघाई!

## अभिनेत्याने १ जानेवारीला गोव्यात केलं प्रपोज, २१ तारखेला जम्मूमध्ये' करणार लग्न




### लग्नाच्या तयारीत व्यग्र आहेत मेघा व साहिल

मेघाने 'इमली' आणि 'मिश्री' सारख्या टीव्ही शोमध्ये काम केले आहे. तिच्या ड्रिमी प्रपोजलबद्दल म्हणाली, "साहिलने मला १ जानेवारीला गोव्यात प्रपोज करून सरप्राइज दिलं. त्यानंतर आम्ही लवकरच लग्न करण्याचा निर्णय घेतला. आता आम्ही आमच्या लग्नाच्या तयारीत व्यग्र आहोत. आयुष्याचा नवा अध्याय सुरू करण्यासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत."

मेघाने शेअर केलेल्या या फोटोंवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. तिचा सहकलाकार गौरव मुकेशने तिला शुभेच्छा दिल्या आहेत. दोघेही नेहमी आनंदात राहा, असं तो म्हणाला. मेघाच्या या पोस्टवर जिया शंकर, पारस अरोरा, सीरत कपूर, अनेरी यांनीही कमेंट्स करून दोघांना नवीन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. साहिल फुलच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास त्याने 'दिल ए काउच', 'एनआयएस पटियाला', 'कुंडली भाग्य', 'उतरन', 'हैवान', 'सुहागन,' 'पिया रंगरेझ', 'जगन्नाथ और पूर्वी की दोस्ती अनोखी' आणि 'काटेलाल अँड सन्स' अशा अनेक शोमध्ये काम केलं आहे.

नवीन वर्षातही अनेक कलाकारांची लगीनघाई सुरू आहे. नुकतीच 'तारक मेहता का उल्टा चश्मा' फेम सोनू अर्थात झील मेहता लग्नबंधनात अडकली. 'पाणी' फेम मराठी अभिनेत्री रुचा वैद्यनेही दोन दिवसांपूर्वी साखरपुडा उरकला. आता आणखी एका टीव्ही अभिनेत्रीने गुड न्यूज दिली आहे. 'इमली' फेम अभिनेत्री मेघा चक्रवर्ती लवकरच लग्नगाठ बांधणार आहे. मेघा अभिनेता साहिल फुल याच्याशी लग्न करणार आहे. साहिलने मेघाला गोव्यात प्रपोज केलं. तिथेच दोघांनी साखरपुडा केला.

साहिलने नवीन वर्षाच्या दिवशी १ जानेवारीला जेव्हा मेघाला प्रपोज केलं. मेघाने सोशल मीडियावर फोटो शेअर करून तिच्या भावना व्यक्त केल्या. फोटो पोस्ट करत तिने लिहिलं, "नवीन वर्ष, नवीन सुरुवात, आम्ही आशा आणि कृतज्ञतेने २०२५ चे स्वागत करत आहोत. आता आम्ही आणखी एक घोषणा करत आहोत की आम्ही लग्न करणार आहोत."

मेघा चक्रवर्ती आणि साहिल यांचे लग्न याच महिन्यात होणार आहे. दोघेही २१ जानेवारीला जम्मूमध्ये लग्न करणार आहेत. या सोहळ्याला फक्त कुटुंब आणि जवळचे मित्र उपस्थित राहणार असल्याचं मेघाने सांगितलं. लग्नापूर्वी हळदी समारंभ आणि इतर विधी करणार असल्याचं ती म्हणाली.

# अमृता देशमुखने वहिनी कृतिका देवबरोबर शेअर केला व्हिडीओ



'बिग बॉस मराठी ४'फेम अभिनेत्री अमृता देशमुख सातत्याने चर्चेत असते. कधी तिच्या 'नियम व अटी लागू' या नाटकामुळे, तर कधी सोशल मीडियावरील तिच्या पोस्टमुळे ही अभिनेत्री सातत्याने चाहत्यांचे लक्ष वेधून घेत असते. अनेकदा ती प्रसाद जवादेबरोबरच्या फोटो, व्हिडीओ यांमुळेदेखील ती चर्चेत असते. आता अभिनेत्रीने तिच्या भावाच्या पत्नीबरोबर म्हणजेच अभिनेत्री कृतिका देवबरोबर एक व्हिडीओ शेअर केला आहे.

अमृता देशमुखने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये अमृता व कृतिका विविध पोशाखांमध्ये दिसत आहेत. साडी व ड्रेसमध्ये या दोन्ही अभिनेत्री अत्यंत सुंदर दिसत आहेत. व्हिडीओच्या शेवटी त्या थकून बसलेल्या दिसतात. हा व्हिडीओ शेअर करताना अमृताने, "आमचा डिसेंबर थकवणारा होता. लग्न, साडी, डान्स व रील्स!", अशा आशयाची कॅप्शन दिली आहे.अभिनेत्याबरोबरच अनेक चाहत्यांनीदेखील तिच्या या व्हिडीओवर कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्याने लिहिले, "अमृताताई, तू नेहमी क्यूट दिसतेस", दुसऱ्या एका चाहत्याने, "किती छान आणि सुंदर. खूप म्हणजे खूप मस्त", असे लिहीत कौतुक केले. आणखी एका नेटकऱ्याने "आवडती जोडी", अशी कमेंट केल्याचे पाहायला मिळत आहे. एका नेटकऱ्याने अमृता व कृतिकाला टॅग करीत लिहिले, "कमाल, गोड मुलींनो. तुम्हा दोघींना खूप प्रेम", तर अनेकांनी मस्त, भारी, असे म्हणत या दोघींवर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

अमृता देशमुख ही अभिनयाबरोबरच तिच्या सोशल मीडियावरील रील्स, फोटो, व्हिडीओ यांमुळेदेखील मोठ्या चर्चेत असते. प्रसाद जवादे व अमृता देशमुख ही जोडी प्रेक्षकांना आवडत असल्याचे दिसते. त्यांच्या फोटोंवर चाहते कमेंट्सच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसतात. तर, कृतिका देवने 'हवाईजादा', 'पानिपत', 'बकेट लिस्ट', 'हॅपी जर्नी', 'डिलिव्हरी गर्ल', 'ताली', 'प्राइम टाइम', 'राजवाडे सन्स' अशा मराठीसह हिंदी चित्रपटांतून काम केले आहे.

### प्रसाद जवादेकडून कौतुक

अमृताच्या या व्हिडीओवर अनेक चाहत्यांनी कमेंट्स करीत कौतुकाचा वर्षाव केला आहे. या सगळ्यात अमृताचा पती प्रसाद जवादेनेदेखील तिच्या या व्हिडीओवर कमेंट करीत लक्ष वेधून घेतले. प्रसाद जवादेने 'भारी' असे लिहीत दोघींचे कौतुक केले आहे.




**मेष** – आर्थिक बाजू सावराल. खरेदीचे बेत साध्य होतील. घरासंबंधीचे प्रश्न सोडवता येतील. हट्टीपणाला मुरड घाला.

**वृषभ** – नको ती आश्वासने देण्याचे टाळावे. कलाक्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. सरकारी नियमांचे पालन करावे.

**मिथुन** – रागावर योग्य नियंत्रण ठेवा. प्रकृतीचे पथ्ये पाळा. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. बाहेर जाण्याचे बेत आखाल.

**कर्क** – पुष्कळशा सकारात्मक गोष्टी साध्य करता येतील. वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घेणे आवश्यक राहील.

**सिंह** – परिश्रमाने आपण यशाची वाट मिळवू शकाल. मनाची चंचलता वाढणार नाही याकडे अधिक लक्ष द्यावे.

**कन्या** – कामकाजात अधिक लक्ष दिल्यास लाभदायक ठरू शकते. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेणे योग्य राहील.

**तुळ** – आर्थिक व्यवसायात सावधानता बाळगा. जोडीदाराची चांगली साथ लाभेल. कलागुणांना प्रोत्साहन मिळेल.

**वृश्चिक** – बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींचे कौतुक होईल. मित्रमंडळीत रमाल. शांतपणे काम करण्याचे धोरण चांगले राहील.

**धनु** – सरकारी नियम व कायदा यांचे कटाक्षाने पालन करा. सामाजिक क्षेत्रात आपला सहभाग असेल. प्रकृती जपा.

**मकर** – आत्मविश्वास वाढून कामाला लागाल. प्रवासात सावधानता बाळगा. शक्यतो नको ते धाडस करू नका.

**कुंभ** – खर्चाचे प्रमाण वाढेल. आपले आत्मपरीक्षण करणे लाभदायक होऊ शकेल. आप्तेष्टांच्या गाठीभेटीचे योग आहेत.

**मीन** – वैवाहिक जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. ज्येष्ठांचे सहकार्य मिळेल.

# वाघाचे दोन तुकडे करुन जंगलात फेकले



**भंडारा (नितीन देवळेकर) :** धाराशिवच्या पायथ्याला गेल्या काही दिवसांपूर्वी वाघाचे दर्शन झाल्याने येथील भागात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मात्र, देशातील वाघांची संख्या आणि त्यांचे महत्त्व या दोन्ही बाबींचा विचार लक्षात घेता वाघाला पकडण्याची परवानगी सहजासहजी वन विभागाकडून देण्यात येत नाही. विशेष म्हणजे नरभक्षक वाघाला ठार करण्याचीही परवानगी सरकारकडून दिली जात नाही. त्यासाठी, न्यायालयाकडून विशेष परवानगी घ्यावी लागते. मात्र, विदर्भातील जंगल परसरात गेल्या १० दिवसांत दोन वाघांची शिकार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ८ दिवसांपूर्वी तुमसर येथे एक वाघ मृतावस्थेत आढळून आला होता. त्यानंतर, भंडाऱ्यात आज सकाळी एका वाघाचे दोन तुकडे करुन त्याची शिकार केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. याबाबत माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

वाघाची शिकार करून त्याचे दोन तुकडे करून जंगलात फेकल्याची धक्कादायक बाब भंडारा जिल्ह्यातील तुमसर वन विभागाच्या हद्दीतील झंझेरीया बिटात आज उघडकीस आली. विजेच्या प्रवाहानं या वाघाची शिकार करून दोन तुकडे केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सध्या वनाधिकारी घटनास्थळावर पोहचले असून उत्तरीय तपासणीनंतर वाघाच्या मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होईल, असं वनाधिकाऱ्यांनी सांगितलं. दरम्यान, याअगोदर ८ दिवसांपूर्वी तुमसर वन विभागाच्या लेंडेझरी परिसरात वाघ मृतावस्थेत आढळला होता, त्यानंतर 8 दिवसांतच आणखी एका वाघाचा मृत्यू झाल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच, वन विभागतही अलर्ट मोडवर आहे.

## चंद्रपूर शहरालगतही वाघाचे दर्शन

यवतमाळच्या जंगलातील वाघ धाराशिवच्या पायथ्याला दिसून आल्याने वन विभागाचे लक्ष तिकडे लागले आहे. तर, चंद्रपूर शहरालगतच्या नांदगाव खुल्या कोळसा खाणीतही वाघाचा वावर असल्याचे बोलले जात होते. दरम्यान या परिसरात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात हा भला मोठा वाघ कैद झाला आहे. बूम बॅरिअरजवळ तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकाला हा वाघ दिसला होता. नांदगाव खाणीच्या आवारात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यातही हा वाघ झाला कैद असून कोळसा खाण क्षेत्रात वाघ असल्याची माहिती वनविभागाला मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी वाघिणीला जेरबंद करण्याचा निर्णय घेतलाय.

# महिला तहसीलदाराकडून चक्क शासकीय भूखंडांची विक्री

**धाराशिव (विशाल कारंडे) :** अधिकार क्षेत्राबाहेरील गावात रहिवासी भूखंड पाडणे, ग्रीन झोन क्षेत्राचे ले-आऊट मंजूर करणे, ओपन स्पेस आणि ॲम्युनिटी स्पेस विकासकांच्या घशात आणि चक्क शासकीय भूखंडांची विक्री; अशा एक ना अनेक भानगडी करणाऱ्या धाराशिवच्या तहसीलदार मृणाल जाधव यांचे निलंबन करा, त्याखेरीज त्यांची संपूर्ण चौकशी करताच येणार नाही, असा स्पष्ट अंतरिम चौकशी अहवाल उपविभागीय अधिकारी संजय डव्हळे यांनी जिल्हाधिकारी आणि छत्रपती संभाजी नगरच्या विभागीय आयुक्तांकडे सादर केला आहे, त्यामुळे तहसील कार्यालयातील अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला आहे.

धाराशिव येथील तहसीलदार मृणाल जाधव यांच्या विरोधात आलेल्या तीन तक्रारींचा संदर्भ देत उपविभागीय अधिकारी संजय डव्हळे यांनी १ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे अंतरिम चौकशी अहवाल सादर केला आहे. पहिल्या तक्रारीत तहसीलदार



मृणाल जाधव या अतिशय भ्रष्ट असून जे पैसे देतात, त्यांच्याच शेतरस्त्यांची कामे करतात असा आरोप शिवसेना उबाठा गटाच्या पदाधिकाऱ्याने केला होता; तर विद्युत मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र न घेता, उच्चदाब वाहिनीखालीही रहिवासी भूखंडास मंजुरी दिल्याचे समोर आले आहे. या अनुषंगाने डव्हळे यांनी कसलीही पूर्वसूचना न देता अचानक तहसील कार्यालयाची झाडाझडती घेतली. तहसीलदार कार्यालयात उपस्थित नव्हत्या. काही संचिकांची पाहणी केली, त्यानुसार पुढील बाबी निदर्शनास आल्या असल्याचे डव्हळे यांनी सादर केलेल्या अंतरिम चौकशी अहवालात नमूद केले आहे.

**SPORT**

# Thank God I don't have to play Jasprit Bumrah: Usman Khawaja



India fast bowler Jasprit Bumrah had a tremendous Border-Gavaskar Trophy. Bumrah produced one of the best-ever bowling performances by an overseas pacer in Australia and picked up 32 wickets. Bumrah's tally broke the record of Bishan Singh Bedi for the highest wicket tally by any Indian pacer in a Test series vs Australia.

Australia opener Usman Khawaja gave a glowing tribute to Bumrah after the conclusion of the Test series on Sunday. Speaking in a post-match interview in Sydney, Khawaja thanked God because he did not have to face Bumrah any more.

Khawaja struggled against Bumrah in the early overs, like most batters in the Test series. The 38-year-old batter, who has scored 5600+ runs in Test cricket said that Bumrah simply did not give him any opportunity to score runs off him.

Bumrah was not able to bowl on Day 3 of the final Test match in Sydney. The stand-in India captain picked up a back injury and could not take the field in the final innings of the match. Khawaja said that the absence of Bumrah made life easier for the Australian batters and they cracked the whip in the chase.

The absence of Bumrah let Australia cut loose early, and they ended up chasing the target in just 27 overs.

"I was just getting Bumrah'd. It was tough work. I have to face this guy with the new ball every single time. you never want to see anyone injured and it's a shame he was but thank God for us. Today would've been an absolute nightmare facing him on that wicket. As soon as we didn't see him out there we thought 'alright, we've got a chance here'," Usman Khawaja said.

"He's the toughest bowler I've ever faced. And I have faced him in 2018. he got me out once, he was alright, he was good but he has been something else this year. He has got his tail up," he added.

Asked about what made Bumrah special in this series, Khawaja said that apart from the spicy wickets, Bumrah's evolution and understanding of the game has helped him attain unimaginable heights.

"The wickets have definitely helped him. He is 6 years more mature. He understands his skills, who he is bowling to. He has different plans for everyone. I always felt like no matter how good a bowler is I can always get something to score runs, but I did not get anything at all from him. He's just so hard. I don't have to face him again, thank God," concluded Khawaja.



## Schedule, format, prize money, livestreaming details and how to watch in India

**NEW DELHI :**2025's first grand slam Australian Open is set to begin on Monday (January 6). The biggest names in Tennis will go head to head in Australia. In the men's division, world No. 1 Jannik Sinner is looking to build on his 2024 breakthrough, when he claimed his first major title by defeating Daniil Medvedev, a run that included snapping Novak Djokovic's 33-match Australian Open winning streak. Medvedev and Djokovic are among the top 10 seeds for 2025, while other notable challengers include Alexander Zverev, Carlos Alcaraz, and American standouts Taylor Fritz, Tommy Paul, and Frances Tiafoe. In the women's singles tournament, top seed Aryna Sabalenka aims to make history by becoming the first player since Martina Hingis in 1999 to win three consecutive championships. The competition will be intense, with Iga Swiatek returning to action after serving a one-month WTA suspension for doping violations, which ended on December 28. U.S. stars Coco Gauff and Jessica Pegula are also seen as strong contenders for the title.

## Not Gill Or Pandya! 31-Year-Old Star Likely To Be India's Vice-Captain In Champions Trophy 2025

**NEW DELHI :** After the conclusion of the almost two-month-long Test tour of Australia, which ended in a 1-3 series defeat on Sunday (January 5), the Indian men's cricket team will shift its focus to white-ball cricket now. India will face England in a five-match T20I series that starts on January 22 in Kolkata, and then the two teams will play each other in a three-match ODI series. The three 50-over matches will help India prepare for the 2025 edition of the ICC Champions Trophy, which is set to start on February 19.



India will not travel to Pakistan for the ICC event and instead will play its matches in Dubai. India's first match in the Champions Trophy is scheduled to take place on February 20 against Bangladesh, and on Sunday, February 23, India will face Pakistan at Dubai International Cricket Stadium. India's last league match is on March 2 against New Zealand, and if the world No. 1 ODI team manages to qualify for the knockouts, then its semifinal match will be played on March 4 in Dubai and the final on March 9.

India is expected to announce its 15-member squad for the Champions Trophy by January 12, and according to a report in Times of India on Monday (January 6), star fast bowler Jasprit Bumrah will be India's vice-captain if there are no major fitness concerns. Bumrah, who led India in the first and fifth Tests of the recently concluded five-match series against Australia, will serve as Rohit Sharma's deputy.

India last played a white-ball series in August 2024 against Sri Lanka, and in that, Shubman Gill was India's vice-captain. In the past, Hardik Pandya has also served as Rohit's deputy. The star all-rounder was India's vice-captain in the ODI World Cup 2023 before being ruled out due to injury.

India's white-ball regulars Shreyas Iyer, Hardik Pandya, and Arshdeep Singh are almost certain to be picked for the Champions Trophy, and it will be interesting to see if Mohammed Shami, who last played for India on November 19, 2023, also finds a place in the side.

Except for Bumrah, who could be rested due to workload management, all other Champions Trophy-bound players are likely to feature in three ODIs against England that are set to be played on February 6, 9, and 12 in Nagpur, Cuttack, and Ahmedabad, respectively.

## A French club, Lebrun siblings connect to Manav Thakkar's growth



**Mumbai:** Manav Thakkar, India's No.2 male paddler, noticed how the Lebrun brothers, the French siblings who have taken the table tennis world by storm, would "invent stuff" post training sessions even as the others would wind down. They'd play a quick game with two bounces on the table, or with just high balls, or simply stationed at the net."It would last only for 10-15 minutes, and there is no goal as such in what they do," Thakkar said. "But who knows, maybe once in 10 or 20 times, that would come in handy." The 24-year-old Thakkar has had a ringside view to the meteoric rise of 18-year-old Felix (world No.4) and 21-year-old Alexis (world No.16) — they are also the No.1 men's doubles pair — training and playing alongside them in France. That is also helping spur the growth of Thakkar, who has risen to world No.59 from outside the top 100 until mid-2023. For about a month in September-October, Thakkar played for French club Nimes Montpellier Table Tennis Alliance, the Montpellier club that has produced, and is home to, the Lebrun brothers. Felix and Alexis are his teammates on match days in their top division French league, and sparring partners on other days.



# Rohit Sharma Has a Future in Stand-up Comedy': India Captain Roasted After Border Gavaskar Trophy Disappointment

**NEW DELHI -** Rohit Sharma was mocked by former Australian cricketer Simon Katich after his struggles in the recently concluded Border-Gavaskar Trophy series where India lost 1-3.

"Well, if you look at the numbers, they are damning. We saw it in this Test. It was very selfless of him to opt out of the Test," Katich told Star Sports.

"I saw in that interview, very well-spoken. There's no doubt he has a future after he is done playing cricket in stand-up comedy because his humor was very good," he added.

"Only he knows whether he has the hunger and drive at 37 to go again. England is not going to be an easy series," he said.

"England are on their way up. They have some good young quicks coming through. Gus Atkinson and Brydon Carse are doing well.

"I dare say that will be a tough tour if he chooses to go on it and the Indian selectors pick him, first and foremost. "Those numbers are not for pretty reading. Test cricket isn't a place for 37-year-olds at the top of the order," he concluded.

Earlier, Rohit had given an interview to Star Sports and spoke at length about whether he 'opted out' of the Sydney Test, was 'rested' or 'dropped'.

"None of the three things. I stood down. This is what I say. Stand down. I will say a few words, fifty words will be made out of it. So basically, runs are not coming from my bat, I am not in form, it is an important match, we need players in form, the boys in our batting are not in form, so you cannot carry too many out-of-form players in the team.

# छत्तीसगडमध्ये ९ जवानांना वीरमरण

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

**विजापूरमध्ये नक्षलवाद्यांनी मोठा हल्ला केला असून, सुरक्षा दलाच्या वाहनाला आयईडी ने लक्ष्य करण्यात आलंय. नक्षलवाद्यांनी कुटरू रोडवर आयईडी बॉम्ब पेरला होता, सुरक्षा दलाचे वाहन तिथे आल्यानंतर हा स्फोट झाला. आयईडी स्फोटात ९ जवान शहीद झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तसेच ६ हून अधिक जवान गंभीर जखमी झालेत. जवानांचं पथक ऑपरेशन करून परतत होते. दंतेवाडा, नारायणपूर आणि विजापूरचे संयुक्त ऑपरेशन दल ऑपरेशननंतर परतत असताना नक्षलवाद्यांनी विजापूर जिल्ह्यातील कुटरू-बेद्रे रस्त्यावर हा हल्ला केला.**



जवळपास दुपारी २:१५ वाजताच्या सुमारास नक्षलवाद्यांनी कुटरू पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आंबेली गावाजवळ आयईडीचा स्फोट करून सुरक्षा दलाचे वाहन उडवले. बस्तरचे आयजी यांनी दिलेल्या माहितीनुसार, नक्षलवाद्यांनी विजापूरमध्ये आयईडी स्फोटाने सुरक्षा दलांची वाहने उडवून दिली. या हल्ल्यात आठ डीआरजी जवान आणि दंतेवाडा येथील एका चालकासह नऊ जवान शहीद झाले. सुरक्षा दल दंतेवाडा, नारायणपूर आणि विजापूर येथे संयुक्त कारवाई करून परतत होते.

बस्तरचे आयजी पी. सुंदरराज यांनी सांगितले की, दंतेवाडा, विजापूर आणि नारायणपूर जिल्ह्यांतील सीमावर्ती भागात गेल्या तीन दिवसांपासून नक्षलवाद्यांविरोधात कारवाई सुरू आहे. यामध्ये ५ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले असून, आमचा एक जवान शहीद झालाय. त्यानंतर आमची टीम परतत असताना विजापूरच्या आंबेली भागात नक्षलवाद्यांनी आयईडी बॉम्ब पेरला होता, सुरक्षा दलाचे वाहन त्या ठिकाणी आल्यानंतर त्याचा स्फोट घडवण्यात आला. त्यात ८ जवान आणि एक चालक शहीद झाला.

आयईडी स्फोटावर मुख्यमंत्री विष्णू देव साई म्हणाले की, विजापूरच्या कुटरू येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या आयईडी स्फोटात ८ जवान आणि एक चालक शहीद झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. शहीद जवानांच्या कुटुंबीयांसोबत माझ्या संवेदना आहेत. शहीद जवानांच्या आत्म्याला शांती मिळो आणि शोकाकुल कुटुंबीयांना देव बळ देवो, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. नक्षलवादी हतबल आहेत आणि त्यामुळेच ते अशा प्रकारचे भ्याड हल्ले करीत आहेत. जवानांचे हौतात्म्य व्यर्थ जाणार नाही. नक्षलवाद संपवण्याचा आमचा लढा जोरदार सुरू राहील, असंही त्यांनी सांगितलं.

छत्तीसगड विधानसभेचे अध्यक्ष रमण सिंह यांनी विजापूर आयईडी स्फोटावर म्हटले की, जेव्हा जेव्हा नक्षलवाद्यांविरोधात मोठी कारवाई केली जाते, तेव्हा ते अशी भ्याड कृत्ये करतात. नक्षलवादाच्या विरोधात छत्तीसगड सरकार जी पावले उचलत आहे, ती आणखी तीव्र केली जाणार आहेत. सरकार घाबरणार नाही आणि झुकणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई सुरूच राहणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.


छत्तीसगड सरकारचे उपमुख्यमंत्री अरुण साओ यांनी आयईडी स्फोटाला नक्षलवाद्यांचे भ्याड कृत्य म्हटले आहे. अरुण साओ म्हणाले की, नक्षलवाद्यांच्या भ्याड कृत्याची माहिती विजापूरमधून आलीय. नक्षलवाद्यांचे हे भ्याड कृत्य आहे. जवानांच्या हौतात्म्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. लवकरच छत्तीसगड नक्षलमुक्त होईल, असा विश्वासही त्यांनी बोलून दाखवला.

## मनोज जरांगेंवर तीन ठिकाणी गुन्हा दाखल!

● मुंबई, राकेश गायकवाड :

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यावर तीन ठिकाणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंत्री धनंजय मुंडेंविरोधात केलेल्या वक्तव्यामुळे त्यांच्यावर हा अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ परभणी येथे मोर्चा आयोजित करण्यात आला होता. दरम्यान, यावेळी बोलताना मनोज जरांगेंनी मंत्री धनंजय मुंडेंबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले. जरांगेंचे भाषण दोन समाजात तेढ निर्माण करणारे आहे असा आरोप करत बंजारा समाजातील लोकांनी परळी येथे शिवाजीनगर पोलिस ठाण्याबाहेर ठिय्या आंदोलन केले.



त्यानंतर मनोज जरांगेंवर अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. धनंजय मुंडे समर्थकांनी देखील आक्रमक भूमिका घेत जरांगेंवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. त्यामुळे परळी, केज, अंबाजोगाई या तीन ठिकाणी त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## यार्ड रि-मॉडेलिंगसाठी दिल्ली मार्गावरील काही रेल्वेगाड्या रद्द



● नागपूर, नितीन देवळेकर :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील नागपूर – आमला स्थानकादरम्यान येणाऱ्या गोधनी रेल्वे स्थानकामधील तिसऱ्या रेल्वे मार्गाच्या संबंधित पहिल्या टप्प्यातील 'यार्ड रेमॉडेलिंगच्या कामाकरिता काही रेल्वे गाड्या रद्द तर रेल्वेगाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. गोधनी रेल्वे स्थानकावरील कामांमुळे ६ आणि ८ जानेवारीला विभागातून धावणाऱ्या काही गाड्या रद्द आणि काही गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आल्या आहेत.

गाडी क्र. १२१५९ अमरावती – जबलपूर सुपरफास्ट एक्सप्रेस ही गाडी ६ जानेवारी आपल्या निर्धारित वेळ सुटण्याऐवजी अर्धा तास उशिरा धावेल. गाडी क्र. १२१५९ अमरावती – जबलपूर सुपरफास्ट एक्सप्रेस ही गाडी ८ जानेवारी आपल्या निर्धारित वेळ सुटण्याऐवजी दीड तास उशिरा धावेल.

### या गाड्या रद्द

- ■ गाडी क्र. ६११९८ आमला – नागपूर मेमो ६ आणि ८ जानेवारी ला रद्द करण्यात आली आहे.
- ■ गाडी क्र . ६१११९ नागपूर- आमला मेमो ६ आणि ८ जानेवारी ला रद्द करण्यात आली आहे.
- ■ गाडी क्र. ६११२० आमला – नागपूर मेमो ८ जानेवारीला रद्द करण्यात आली आहे
- ■ गाडी क्र . ६१११७ नागपूर- आमला मेमो ८ जानेवारीला रद्द करण्यात आली आहे.

## काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड विरोधात हायकोर्टात याचिका

### लोकसभा निवडणुकीत पैसे वाटल्याचा आरोप

● मुंबई, विशाल पाटील :

काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांच्याविरोधात दाखल केलेल्या निवडणूक याचिकेवरील निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी राखून ठेवला. वर्षा गायकवाड यांनी गेल्या वर्षी मुंबई उत्तर-मध्य मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली होती. भाजपच्या उज्ज्वल निकम विरुद्ध वर्षा गायकवाड अशी हायप्रोफाईल आणि अटीतटीची लढत झाली होती. ठाकरे गटाच्या पाठिंब्यानंतर वर्षा गायकवाड या मुंबईतल्या काँग्रेसच्या एकमेक खासदार म्हणून निवडून आल्या होत्या. वर्षा गायकवाड यांनी उज्ज्वल निकम यांचा १६,५१४ मतांनी विजयी झाले.

खासदार वर्षा गायकवाड यांच्या विजयाला आसिफ सिद्दीकी नावाच्या उमेदवाराने आव्हान दिलं होतं. निवडून आलेल्या वर्षा गायकवाड यांनी वितरित केलेल्या हँडबिल्समध्ये विहित नियमांचे पालन केले नाही असा आरोप आसिफ सिद्दीकी यांनी केला होता. हँडबिल्समध्ये खोटी आश्वासने असल्याचे आसिफ सिद्दीकी यांनी म्हटलं होतं. सिद्दीकी यांनी या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

दुसरीकडे, वर्षा गायकवाड यांनी या याचिकेच्या मान्यतेला विरोध केला होता. आपल्या निवडणुकीच्या प्रचारात काही त्रुटी असल्याचे दाखविण्यासाठी कोणतेही भौतिक तथ्य नसल्याचा युक्तिवाद वर्षा गायकवाड यांनी केला होता. तसेच ही याचिका फेटाळण्याची विनंती कोर्टाला केली होती. गायकवाड यांची बाजू मांडणारे अधिवक्ता तेजस देशमुख यांनी युक्तिवाद केला की खोटी आश्वासने असलेल्या हँडबिलाबाबत याचिकाकर्त्याचा दावा चुकीचा आहे.



कथित खोटी आश्वासने कोणती होती याचा तपशील याचिकेत दिलेला नाही, असा युक्तिवाद देशमुख यांनी केला.

मतांच्या बदल्यात मतदारांना पैसे वाटल्याचा आरोपही वर्षा गायकवाड यांच्यावर करण्यात आला. पैसे वाटल्याचे व्हिडिओ समोर आल्याचा आरोप याचिकाकर्त्याने केला. यावर युक्तीवाद करताना देशमुख यांनी म्हटलं की, पैसे वाटण्याचा व्हिडिओ याचिकेसोबत जोडलेला नाही आणि ज्या विद्यमान आमदाराचा उल्लेख करत आहेत ते झिशान सिद्दीकी आहेत.याचिकाकर्त्याची बाजू मांडणारे अधिवक्ता मोईन चौधरी यांनी म्हटलं की याचिकेसोबत व्हिडिओ दिले नाहीत हे कारण वर्षा गायकवाड या सध्या खासदार आहेत. "ते व्हिडिओ कोणी शूट केले हे त्यांना कळले तर ते साक्षीदारांना नुकसान पोहोचवू शकतात. ज्या व्यक्तीने व्हिडीओ शूट केला आहे त्याला जेव्हाही बोलावलं जाईल तेव्हा तो साक्षीदार म्हणून हजर होण्यास तयार आहे," असा युक्तीवाद चौधरी यांनी केला. तसेच वर्षा गायकवाड यांनी न्यायालयीन नोंदीमध्ये चुकीचा निवासी पत्ता दिला असल्याचाही युक्तिवाद चौधरी यांनी केला. तसेच याचिकाकर्त्याने व्हिडिओ पोलिस आणि निवडणूक आयोग या दोघांकडे नेले होते, परंतु अहवालानुसार, कोणत्याही प्राधिकरणाने कोणतीही चौकशी केली नाही, असंही चौधरी म्हणाले. दरम्यान, दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपीठाने निवडणूक याचिका कायम ठेवण्याबाबतचा निर्णय राखून ठेवला आहे.

## समुद्रात जाणारे सांडपाणी रोखणार!

### ■ STP चे सात प्रकल्प २०२८ पर्यंत पूर्ण होणार !

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबईच्या मलजल वाहिन्यातील सांडपाणी समुद्रात जाऊ नये यासाठी पालिकेने ७ एसटीपी अर्थात सांडपाणी प्रक्रिया केंद्रे स्थापन केली असून, ही सर्व केंद्रे टप्प्याटप्प्याने २०२६ ते २०२८ या दरम्यान पूर्णपणे कार्यन्वित होतील, अशी माहिती आता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. मुंबईतील विविध प्रदूषणावर चर्चा करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) यासंदर्भातील तपशीलवार माहिती मागितल्यानंतर पालिकेकडून त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात आले.मुंबईची पाण्याची दररोजची गरज ४५०० दशलक्ष लिटर असून, उपलब्ध पाणीपुरवठा हा ३,८३० दशलक्ष लिटर आहे. त्यामुळे अंदाजे ६७० दशलक्ष लिटर पाण्याची तूट आहे. भविष्यात ही तूट आणखी वाढण्याची शक्यता आहे. दुसऱ्या बाजूला शहरात पुरवठा केल्या जाणाऱ्या पाण्यापैकी २४६४ दशलक्ष लिटर म्हणजे ८० ते ९० टक्के भाग सांडपाण्याच्या रूपाने समुद्रात सोडला जातो. या पाण्यावर पुनर्प्रक्रिया करून ते वाचविण्याचा प्रयत्न पालिकेकडून केला जाणार आहे. त्यादृष्टीने सध्या वरळी, वांद्रे, मालाड, घाटकोपर, धारावी, भांडुप, वर्सोवा अशा ७ ठिकाणी एसटीपी केंद्रे कार्यरत आहेत. जानेवारी २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. यातून दररोज २४६४ दशलक्ष लिटर पाण्यावर तृतीय स्तरावरील प्रक्रिया करून ५० टक्के म्हणजे, १२३२ दशलक्ष लिटर पाणी वापरण्यायोग्य करण्याची पालिकेची योजना आहे.



सातही एसटीपी प्रकल्पांचे काम वेगाने सुरू असून, नियोजित वेळेपूर्वी ते पूर्ण होईल. त्यापैकी धारावी प्रकल्पातून ४१८ एमएलडी, वरळी प्रकल्पातून ५०० एमएलडी, वांद्रे येथून ३६० एमएलडी, वर्सोवा प्रकल्पातून १८० एमएलडी, मालाडमधून ४५४ एमएलडी, घाटकोपर प्रकल्पातून ३३७ एमएलडी आणि भांडुप एसटीपी प्रकल्पातून २१५ एमएलडी पाण्यावर प्रक्रिया करून ते स्वच्छ केले जाणार आहे.या प्रकल्पात प्रक्रिया केलेले पाणी विविध आस्थापनांना त्यांच्या व्यावसायिक वापरासाठी पालिकेकडून विकण्यात येणार आहे. हे पाणी पिण्यायोग्य नसले तरी त्याचा व्यावसायिक वापर होऊ शकतो. त्यामुळे याचा वापर महसूल वाढीसाठी करण्यात येणार आहे. त्यासाठी एमआयडीसी, पोर्ट ट्रस्ट, बीपीसीएल, एचपीसीएल, टाटा पॉवर, आरसीएफ यांच्याशी बोलणी सुरू असल्याची माहितीही समोर आली आहे.

| प्रकल्प | नियोजित वेळ |
|---|---|
| ■ वर्सोवा | जुलै २०२६ |
| ■ घाटकोपर | जुलै २०२६ |
| ■ भांडुप | ऑगस्ट २०२६ |
| ■ वांद्रे | जुलै २०२७ |
| ■ वरळी | जुलै २०२७ |
| ■ धारावी | जुलै २०२७ |
| ■ मालाड | जुलै २०२८ |

## आनंददायी शिक्षणाद्वारे राज्याचा लौकिक वाढवावा - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

● मुंबई, राकेश गायकवाड :

शिक्षणसंस्थेचे यश व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देण्यात संस्थाचालकांची भूमिका अत्यंत मोलाची राहणार आहे. यासाठी संस्था चालकांनी या शिक्षण पद्धतीत सक्रिय सहभाग घेऊन शिक्षण क्षेत्रात राज्याचा लौकिक निर्माण करण्यास पुढे यावे, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. गुणवत्तापूर्ण, आनंददायी शिक्षण पद्धती या विषयावर नामांकित शिक्षण संस्था आणि शैक्षणिक संस्थांच्या मान्यताप्राप्त संघटनांचे प्रतिनिधींचे चर्चासत्र यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आले.

शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले की, सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण महत्वाचे आहे. देशाची आदर्श भावी पिढी घडविण्यासाठी शिक्षणसंस्था शिक्षण प्रसाराचे काम अविरतपणे करत आहेत. यापुढे कौशल्य व तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देण्यावर भर द्यावा. संस्थेत शैक्षणिक वातावरण अधिक पोषक ठेवण्यात संस्थाचालकांची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे शिक्षण संस्थांनी आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धतीत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करावेत. शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले की, शालेय शिक्षण विभागाचा कृतिवर अधिक भर असल्याने शिक्षण संस्थेच्या चांगल्या कामास, उपक्रमास सहकार्य केले जाईल. शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञ, संस्थाचालक यांच्या अनुभवाचा लाभ घेऊन शिक्षण विभागाचे काम समन्वयाने पुढे नेऊया. शिक्षण संस्थांच्या मागण्याबाबत शालेय शिक्षण विभाग नेहमीच सकारात्मक आहे. चर्चासत्रात संस्थाचालक व संघटनेच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या शिक्षक भरती, संच मान्यता, पवित्र पोर्टल, ११ वी प्रवेश प्रक्रिया, रोस्टर तपासणी, जुनी पेन्शन, सेवा ज्येष्ठता, अशैक्षणिक कामे यासंदर्भातील मुद्यांचा प्राधान्याने विचार केला जाईल, असे शालेय शिक्षण मंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

## संतोष देशमुख हत्येप्रकरणी राज्यपालांनी हस्तक्षेप करून मुंडेंचा राजीनामा घ्यावा

### सर्वपक्षीय शिष्टमंडळाची राज्यपालांकडे मागणी

● मुंबई, विशाल पाटील :



बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राज्यातील सर्वपक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळाने सोमवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतलीय. संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या आणि सुरू असलेल्या खंडणीखोरीच्या कारवायांमुळे बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अस्तित्वात राहिलेली नाही, असा आरोप शिष्टमंडळाने केलाय. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप होण्याची शक्यता लक्षात घेऊन मंत्री धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा तातडीने राजीनामा घेण्यात यावा, अशी प्रमुख मागणी यावेळी शिष्टमंडळाने राज्यपालांकडे केलीय.

माजी खासदार संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखाली राज्यपालांना भेटलेल्या या सर्वपक्षीय शिष्टमंडळात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, खासदार बजरंग सोनावणे, आमदार सुरेश धस, आ. जितेंद्र आव्हाड, आ. संदीप क्षीरसागर, ज्योती मेटे यांचा समावेश होता. या प्रकरणात पक्षपातपणा होत असल्याचा संशय असल्याने आणि आरोपींना राज्य सरकारकडून कथित पाठिंबा मिळत असल्याने नागरिकांचा विश्वास उडालाय, त्यामुळे राज्यपालांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आलीय.

कायद्याचे राज्य" ही भावना दृढ होण्यासाठी अपहरण, खंडणी आणि खून प्रकरणाचा सूत्रधार वाल्मिकी कराड याच्याविरुद्ध बीएनएस १०३ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करून खटला जलदगती न्यायालयात चालवावा. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी सुनिश्चित करून कर्तव्यात कुचराई करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. बीडमधील रहिवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करावी आणि खंडणी आणि गुंडगिरीला आळा घालण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशा मागण्या शिष्टमंडळानं केल्यात.

राज्यपालांना भेटल्यानंतर संभाजीराजे म्हणाले, ही माणुसकीची हत्या आहे. त्यामुळे या प्रकरणात जातीच्या पलिकडे जाऊन देशमुखांच्या मारेकऱ्यांना शिक्षा होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. मराठा-वंजारी असा वाद करण्याची गरज नाही. आम्ही या प्रकरणात राज्यपालांनी लक्ष घालावे, अशी मागणी केलीय. राज्यपालांनी या प्रकरणात लक्ष घालण्याचे आश्वासन दिलंय. पुरोगामी महाराष्ट्रात शाहू फुले आंबेडकरांचा विचार जिवंत ठेवण्यासाठी जातीपातीच्या पुढे जाण्याची गरज आहे. धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्याची गरज आहे. यापूर्वी ए. आर. अंतुले, मनोहर जोशी, अशोक चव्हाण, आर. आर. पाटील, अशा विविध नेत्यांनी लोकांचा आक्रोश पाहून राजीनामा दिला होता. आता धनंजय मुंडेंना सरकार, अजित पवार का संरक्षण देत आहेत, असा प्रश्न त्यांनी विचारलाय.

■ आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बीडमध्ये यापूर्वी झालेल्या प्रकरणांचा तपास होण्याची गरज व्यक्त केलीय. मराठा वंजारी हा वाद करू नये. सरकारने मुंडेंना वाचवण्याचा प्रयत्न करू नये, असे आव्हाड म्हणालेत. चौकशी अधिकाऱ्यांचे आरोपींसोबत संबंध आहेत. त्यांचे इंटरेस्ट आहेत, त्यामुळे या प्रकरणातील चौकशी अधिकारी तत्काळ बदलावेत, अशी मागणी अंबादास दानवेंनी केलीय. राज्यपालांना भेटल्याने या प्रकरणात न्याय मिळेल, अशी आशा दानवे यांनी व्यक्त केलीय.